# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक २४ मार्च, २०१५ / चैत्र ३, १९३७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **महसूल, पुनर्वसन व मदत कार्य, भूंकप पुनर्वसन, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ, कृषी आणि फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय, राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **परिवहन मंत्री** | |
| **(३)** | **ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ६०**

---

**राज्यात वाळूमाफियांकडून अवैधरित्या वाळूचा मोठया प्रमाणात होत असलेला उपसा**

**(१) * ४१४२ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.गोपिकिशन बाजोरीया, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: अकोला जिल्ह्यातील पिंजर परिसरातील खेर्डा (भागाई) निंबी, दोनद मोरगांव, (काकड) राहीत, पिंजर्डा नदी पात्रातून, ठाणे जिल्ह्यातील नदीपात्रांमध्ये तसेच, खाडीमध्ये व मौजे चळे-सुस्ते (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील भीमा नदीतून बेकायदा वाळू उपसा होत असून रेतीमाफियाविरोधात मेरीटाईम बोर्डाने कारवाई करण्याबाबतचे आदेश राष्ट्रीय हरीत न्यायाधिकरणाने दिले असता त्याची अंमलबजावणी होत नसल्याचे तसेच वाळू उपसा रोखण्यासाठी गेलेल्या महसूल कर्मचाऱ्यांवर वाळू माफियांनी टिपर अंगावर घालून कर्मचाऱ्यांस मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास वाळूमाफियांकडून शासनाचा दररोजचा लाखो रूपयांचा महसूल बुडविला जात आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास वाळूमाफियांची तस्करी रोखण्यासाठी दिनांक १ नोव्हेंबर, २०१४ रोजी भरारी पथकांची नेमणूक करूनही महसूल विभागाच्या डोळ्यात धूळ फेकून वाळूमाफिया रात्री-बेरात्री वाळूचे उत्खनन करीत आहेत, हे ही खरी आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) तदनुसार यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३), (४), (५) व (६) राज्यातील विविध भागात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूकीची अनेक प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आली आहेत, ही वस्तुस्थिती आहे. गौण खनिजाचे अनधिकृत उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी जिल्हा व तालुका स्तरावर भरारी पथके गठीत करण्यात आली आहेत.

अकोला जिल्ह्यातील बार्शीटाकळी तालुक्यात सन २०१४-२०१५ मध्ये गौण खनिजाची अवैध वाहतूक करणा-या ४२ वाहनांवर दंडात्मक कारवाई करुन, रुपये ३,६०,१००/- एवढी रक्कम वसूल करण्यात आली आहे.

ठाणे जिल्ह्यात सन २०१४-२०१५ मध्ये गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या ७४५ प्रकरणात रुपये १,६६,३४,०००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तालुक्यात सन २०१४-२०१५ मध्ये गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या ५ प्रकरणांत रुपये ५,२५,२००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

अमरावती जिल्ह्यातील मौजा भातकुली येथे दिनांक २९/१२/२०१४ रोजी अवैध रेती वाहतूक करीत असलेल्या ट्रॅक्टरवर कारवाई करतांना संबंधित वाहन मालक यांनी नायब तहसिलदार भातकुली व तलाठी अंतापूर यांना मारहाण केली व जिवे मारण्याचा प्रयत्न केला होता. सदर प्रकरणी संबंधितांविरुध्द भातकुली पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने ३ व्यक्तींना अटक करण्यात आलेली असून, आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीमध्ये आहेत. प्रकरणी पोलीस तपास सुरू आहे.

मा.राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, पश्चिम विभाग, खंडपीठ पुणे येथे दाखल अर्ज क्रमांक ३४ (THC) २०१३ (WZ) (आवाज फाऊंडेशन व इतर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर) मध्ये मा.न्यायाधिकरणाने दिनांक २९.५.२०१४ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्रात नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी वाळू/रेती उत्खननाचे धोरण निश्चित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

-----------------

**राज्यात विशेषतः नांदेड, अमरावती, यवतमाळ, जिल्ह्यात दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीटमुळे शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या**

**(२) * ३४४६ श्री.संदिप बाजोरिया, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.प्रकाश गजभिये, श्री.राहुल नार्वेकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.राजेंद्र मुळक, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषतः नांदेड, अमरावती, यवतमाळ, जिल्ह्यात दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट तसेच सतत होणारी नापिकी, सोयाबीन, कापूस पिकांचे झालेले नुकसान यामुळे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याची घोषण शासनाने माहे डिसेंबर, २०१४ व जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, नापिकीमुळे डोक्यावर झालेले कर्जाचे ओझे कसे फेडावे या विवंचनेतील ११८ शेतकऱ्यांनी मागील वर्षात आत्महत्या केली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले हे ही खरे आहे काय

(३) असल्यास उक्त प्रकरणी प्रशासनाच्या उदासीनतेमुळे मदतीचे प्रस्ताव अपात्र ठरल्याने शासनाकडून मिळणारी आर्थिक मदतही अद्याप मृत्यू पावलेल्या शेतकऱ्यांच्या वारसांना मिळालेली नसल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय तसेच, राज्य शासनाने घोषणा केल्याप्रमाणे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत तातडीने निर्णय घेऊन याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२), (३) व (४) सन २०१४ (जानेवारी-डिसेंबर) मध्ये नांदेड जिल्ह्यात एकूण ११८ शेतकरी आत्महत्या प्रकरणे निदर्शनास आली आहेत. यापैकी ७५ प्रकरण शासकीय निकषानुसार पात्र ठरली असून मयत शेतक-याच्या कुटुंबियास प्रत्येकी रु.१.०० लक्ष मदत देण्यात आलेली आहे. ४३ प्रकरणे अपात्र ठरली आहेत.

शासनाने सन २०१४ च्या खरीप हंगामातील बाधित शेतक-यांना अर्थसहाय्य करण्यासाठी रु.४०००/- कोटी निधी वितरित केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बदलापूर नगरपालिकेने स्वातंत्र्यसैनिकाच्या जमिनीवर स्मशानभूमीचे केलेले बांधकाम**

**(३) * ३५३९ ॲड.निरंजन डावखरे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर (जि.ठाणे) येथील जेष्ठ स्वातंत्र सैनिक व वीर बाजीप्रभू देशपांडे यांचे वंशज स्व.रामचंद्र देशपांडे यांना 'स्वातंत्र सैनिक सन्मान योजनेनुसार' राज्यसरकारने शिरगांव बदलापूर येथील सर्वे क्र ११० मधील २ हेक्टर शेतजमिन दिनांक २० एप्रिल, १९७४ रोजी वा त्यासुमारास चरितार्थासाठी दिली होती, हे खरे आहे काय,

(२) तसेच सन १९६७ मध्ये तत्कालिन मुख्यमंत्री (स्व.वसंतराव नाईक) तसेच १९७२ मध्ये तत्कालिन पंतप्रधान (स्व.इंदिरा गांधी) यांनी स्व.रामचंद्र काशिनाथ देशपांडे यांना सन्मानपत्र व ताम्रपत्र देवून सन्मानित केले होते, हेही खरे आहे काय,

(३) तसेच स्वातंत्र्य सैनिक स्व.रामचंद्र देशपांडे यांचे पश्चात सदर जमिनीची वहिवाट सध्या त्यांच्या कन्या श्रीमती प्रिया अनंत राजे करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वीर बाजीप्रभू देशपांडे यांचे वंशज व स्वातंत्र्यसैनिक रामचंद्र देशपांडे यांना त्यांच्या स्वातंत्र्य लढ्यातील योगदानाबाबत प्रदान केलेली सदर जमीन कुळगांव-बदलापूर नगरपरिषदेने हस्तगत करून त्या जागेवर हिंदू स्मशानभूमी उभारण्यात आले असल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, त्याप्रकरणी संबंधित श्रीमती प्रिया राजे यांनी जिल्हाधिकारी, ठाणे, तहसिलदार, अंबरनाथ व प्रधान सचिव सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय यांचेकडे लेखी तक्रार निवेदने सादर करूनही त्याबाबत अद्याप कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, देशाच्या स्वातंत्र्यासाठी हाल-अपेष्टा सोसणा-या स्वातंत्र्य सैनिकांच्याबाबतीत त्यांच्या अहवेलना व अवमुल्यन करणा-या कुळगांव-बदलापूर नगरपालिका व महसूल विभागातील संबंधित दोषींवर शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) तसेच, कुळगांव-बदलापूर नगरपालिकेने अतिक्रमीत जमिन स्वातंत्र्य सैनिकांच्या वारसांना परत देण्यासाठी व जमिनीच्या महसूल दप्तरी नोंदी सुधारण्यासाठी शासनाकडून काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, मौजे शिरगाव, ता.अंबरनाथ येथील स.नं. ११०/३ प्लॉट नं.१ (क्षेत्र २-००-० हे.आर) ही जमीन स्वातंत्र्य सैनिक कै.रामचंद्र काशिनाथ देशपांडे यांना शासनाने सन १९७५ मध्ये कब्जेहक्काने दिली होती.

(२) स्वातंत्र्य सैनिक कै.रामचंद्र काशिनाथ देशपांडे यांना दिनांक ३ जून, १९६८ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री श्री.वसंतराव नाईक यांच्या स्वाक्षरीचे सन्मानपत्र देण्यात आले असून त्यांना ताम्रपत्र देऊनही सन्मानित करण्यात आले होते.

(३) सदर जमिनीच्या अधिकार अभिलेखात सन २००७ मध्ये वारसाने कै.रामचंद्र काशिनाथ देशपांडे यांचे वारस श्रीमती प्रिया अनंत राजे व इतर चार यांची नावे दाखल आहेत.

(४) स्वातंत्र्य सैनिक कै.रामचंद्र काशिनाथ देशपांडे यांना कब्जेहक्काने दिलेल्या सदर जमिनीपैकी ७७३.१८ चौ.मी. क्षेत्रावर कुळगांव-बदलापूर नगरपरिषदेने सन १९९८ मध्ये कम्पाऊंड वॉल व पत्र्याचे शेड बांधले असून त्याचा वापर स्मशानभूमी म्हणून होत आहे.

(५), (६) व (७) श्रीमती प्रिया राजे यांनी दिनांक ०४/०२/२०१४ रोजी दिलेला अर्ज कुळगाव बदलापूर नगरपरिषदेशी संबंधित असल्याने नगरपरिषद यांचेशी संपर्क साधणेबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांनी त्यांना कळविले आहे. सदर जागेवरील स्मशानभूमी काढणेबाबतचा प्रस्ताव अध्यक्ष, नगरपरिषद यांच्या मान्यतेने सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात येत असल्याचे मुख्याधिकारी, नगरपरिषद यांनी दिनांक २५/०६/२०१४ रोजी श्रीमती प्रिया राजे यांना कळविले आहे.

सदर जमिनीस आज रोजी कै.रामचंद्र काशिनाथ देशपांडे यांचे वारस श्रीमती प्रिया अनंत राजे व इतर चार यांची नावे दाखल असल्याने महसूल दप्तरी नोंदी सुधारण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील मराठी माध्यमाच्या खाजगी विनाअनुदानित व अनुदानित सर्व शाळांना निवासी दराने वीज पुरवठा करण्याबाबत**

**(४) * ३९३५ श्री.सतिश चव्हाण, श्री.संदिप बाजोरिया, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गजभिये, डॉ.सुधीर तांबे, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.जयदेव गायकवाड, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मराठी माध्यमाच्या खाजगी विनाअनुदानित व अनुदानित सर्व शाळांना तसेच संस्थेच्या शाळांना निवासी दराने वीज पुरवठा करण्यात येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळांना निवासी दराने वीज पुरवठा करण्यासाठी शासनस्तरावर काय उपाययोजना करणार आहे वा करण्यात येणार आहे,

(३) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय.

(२) शाळांसाठी सार्वजनिक सेवा या वर्गवारीमध्ये वीज बिल देण्यात येते. या वर्गवारीमध्ये ० ते २०० युनिट मधील वीज वापराचे दर घरगुती १०१-३०० युनिट पेक्षा कमी ठेवण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुस्लिम समाजास आरक्षण देण्याचा शासनाच्या कार्यवाहीबाबत**

**(५) * २६६८ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.रामराव वडकुते, श्री.विक्रम काळे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुस्लीम समाजाला ५ टक्के आरक्षण देण्याबाबत मागील शासनाने अध्यादेश काढून सवलती लागू केल्या होत्या, सदर अध्यादेशासंदर्भात विधेयक सादर करुन मंजूरी घेण्याबाबत तसेच यासंदर्भात राज्याचे मा.ॲडव्होकेट जनरल यांचेकडून माहिती घेवून मुस्लीम समाजाला आरक्षण देण्याबाबत निर्णय घेण्यत येईल, असे आश्वासन मा.मुख्यमंत्री यांनी नागपूर अधिवेशनात दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठा आणि मुस्लिम समाजाला एकाचवेळी आरक्षणाचा निर्णय घेतलेला असतानासुद्धा केवळ मराठा आरक्षणाच्या निर्णयासाठीचे विधेयक डिसेंबर २०१४ च्या अधिवेशनात विधीमंडळाने मंजुर केले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील गोरगरीब मुस्लिम समाज आरक्षणासाठी आंदोलनाद्वारे लढा देत असतांना शासनाने मात्र मुस्लिम आरक्षणाचे विधेयक विहित मुदतीत मंजूर न केल्यामुळे या समाजावर अन्याय झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील मुस्लिम समाजाला आरक्षण देण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे वा करीत आहे,
(५) अद्याप, यासंदर्भात कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) ते ओपिनियन प्राप्त करुन घेऊन योग्य ते निवेदन करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले होते.
(२) होय.
(३), (४) व (५) बाबत नमूद करण्यात येते की, सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. मा.उच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय विचारात घेऊन पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**खामगांव, जि.बुलढाणा येथील शेतकऱ्यांनी विदर्भ सघन सिंचन कार्यक्रमातंर्गत शेतकऱ्यांचे अर्ज प्राप्त क्रमवारीनुसार मंजूर करण्याबाबत**

**(६) * ४०६० श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगांव (जि.बुलढाणा) येथील विदर्भ सघन सिंचन कार्यक्रमाअंतर्गत सन २०१२-१३ व २०१३-१४ या दोन वर्षात लाभार्थ्यांनी ठिबक संच या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांनी अर्ज दाखल केले असून, प्राप्त अर्जातील क्रमवारीनुसार ठिबक सिंचन संच शेतकऱ्यांना देण्यात येत नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांना ठिबक संच अर्ज प्राप्त क्रमवारीनुसार देण्याबाबत तसेच प्रलंबित अर्जासाठी लागणारा निधी उपलब्ध करुन संबंधितांना आदेश देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे.
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.
सन २०१२-१३ पासून विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रमांतर्गत सूक्ष्म सिंचनाचे प्रस्ताव ई-ठिबक आज्ञावलीत स्विकारण्यात येतात व क्रमवारीनुसार मान्यता देण्यात येते.
(२) खामगाव तालुक्यातील सन २०१२-१३ या वर्षातील सूक्ष्म सिंचन संचाचे प्रस्ताव प्रलंबित नाहीत.
खामगाव तालुक्याची सन २०१३-१४ या वर्षाची रु. ८.७४ कोटी निधीची मागणी होती. त्यापैकी रु.३.८० कोटी निधी उपलब्ध करुन दिला आहे. उर्वरित प्रस्तांवाची क्षेत्रिय तपासणी करुन अनुदान वितरीत करण्याची कार्यवाही चालु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पालघर जिल्ह्यामध्ये पूर्व भागात लालोंडे येथे पुनर्वसनासाठी राखीव ठेवलेल्या जमिनीत दगडखाण सुरु असल्याबाबत**

**(७) * ४०६८ श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यामध्ये पूर्व भागात लालोंडे येथे पुनर्वसनासाठी राखीव ठेवलेल्या खाते क्रमांक २१५ मधील जमिन सर्व्हे नं.५३ या जमिनीत दगडखाण सुरु असल्याची बाब दिनांक ७ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यादरम्यान उघडकीस आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने शासनाचा कोट्यावधीचा महसूल बुडविणाऱ्या खाण मालकांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कारवाई केली नसल्यास होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) मौजे लालोंडे, ता.पालघर येथील गट क्रमांक ५३ मध्ये माहे मे, २०१२ पर्यंत दगड उत्खननासाठी परवाने देण्यात आले आहेत. तथापि, सद्यस्थितीत सदर ठिकाणी दगड उत्खनन सुरू असल्याचे निदर्शनास आले नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शासनाने नोव्हेंबर, डिसेंबर, २०१४ व जानेवारी २०१५ या कालावधीत जाहिरातीवर केलेला खर्च**

**(८) * ३४१४ श्री.अनिल भोसले, श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.प्रकाश गजभिये, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी पैसे नसणे तसेच, शासनाच्या तिजोरीत खडखडाट असतानाही शासनाने माहे नोव्हेंबर, डिसेंबर, २०१४ व जानेवारी २०१५ मध्ये वा त्यासुमारास जाहिरातीवरील खर्चासाठी १६ कोटी ७३ लक्ष रूपये दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यादरम्यान मंजूर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जाहिरातीसाठी कोट्यावधी रूपये खर्च करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या संबंधात चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यात काय आढळून आले व तदनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक जिल्ह्याचे विभाजन करुन मालेगांव जिल्हा करणेबाबत**

**(९) * २८१५ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ७३५ ला दिनांक १५ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्याचे विभाजन करुन मालेगांव जिल्हा निर्मिती करण्याच्या मागणीचे अनुषंगाने जिल्हा विभाजनासंदर्भात जिल्हा विभाजनाचे निकष ठरविण्याबाबत शासन निर्णय दिनांक २४ जून, २०१४ (अ.मु.स. (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली) अन्वये गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे काय,

(२) असल्यास, अहवालातील शिफारशींचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे व त्यानुषंगाने नाशिक जिल्ह्याचे विभाजन करुन नवीन मालेगांव जिल्हा निर्मिती संदर्भात पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, सदरहू अहवाल केव्हापर्यंत प्राप्त होणे अपेक्षित आहे व गेल्या ३० वर्षांपासून नवीन मालेगांव जिल्हा निर्मितीसंदर्भात करण्यात येणाऱ्या मागणीचे अनुषंगाने नवीन जिल्हा निर्मितीसंदर्भात शासनाचे धारेण काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) जिल्हा विभाजनाचे निकष ठरविण्याकरीता गठीत करण्सात आलेल्या समितीचा अहवाल अद्याप अप्राप्त असून सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर जिल्हा विभाजनाबाबत शासनाचे धोरण निश्चित करण्याचे संकल्पित आहे व त्या आधारेच नवीन मालेगाव जिल्हा निर्मितीबाबत येथोचित निर्णय घेण्याचे योजिले आहे.

-----------------

**मुंबई पुणे महामार्गावर खंडाळा घाटात बोरघाट चौकीजवळ एस.टी. बसला झालेला अपघात**

**(१०) * ३३०३ श्री.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पुणे महामार्गावर खंडाळा घाटात बोरघाट चौकीजवळ एस.टी. बस चालकाचे वळणावर नियंत्रण सुटल्याने झालेल्या अपघातात अनेक प्रवासी जखमी झाले असे दिनांक २२ नोव्हेंबर, २०१४ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मार्गावर नेहमी होणाऱ्या अपघात स्थळांदरम्यान वेगनियंत्रक मार्गदर्शक फलके यांचा वापर करण्याबाबत व अपघात टाळण्यासाठी शासनाने कोणती उपाय योजना केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, त्याचा तपशिल काय,

(४) सदर तपशिल उपलब्ध नसल्यास त्या मागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) सदरहू अपघात दि. २२ नोव्हेंबर, २०१४ रोजी झाला नसून दिनांक ०३.१०.२०१४ रोजी रा.प.बसला मुंबई-पुणे महामार्गावरील लोणावळा-खंडाळा घाटातील पुणे गांव येथे उताराच्या वळणावर झालेला आहे.

(२) व (३) राज्य परिवहन महामंडळाच्या बस गाडयांना वेग नियंत्रक लावण्यात आलेले आहेत. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने सदर रस्त्याच्या संपूर्ण लांबीमध्ये सुचनाफलक, वेगनियंत्रक मार्गदर्शक फलक इ. लावलेले आहेत व अपघात होऊ नये म्हणून वेग प्रतिरोधक उंचवटे (रम्बलरस्ट्रिप्स) व पांढरे पट्टे ठिकठिकाणी मारलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात दुष्काळीपरिस्थिती असूनही पैसेवारीमुळे शेतकऱ्यांना मदत मिळाली नसल्याबाबत**

**(११) * २९७४ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.प्रकाश गजभिये, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दुष्काळी परिस्थिती असूनही ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी आलेल्या २३ हजार ८११ गावामध्ये टंचाई परिस्थितीच्या उपाययोजना करण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१५ मध्ये घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास पैसेवारीमुळे शेतकऱ्यांना मदत मिळालेली नसल्याचे शेतकऱ्यांच्या मोठया प्रमाणात तक्रारी आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पैसेवारी ठरविण्याच्या ब्रिटीशकालीन पध्दतीमुळे शेतकऱ्यांना मदत मिळत नसल्याने सर्वसमावेशक पध्दत ठरविण्यासाठी माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास कृषी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाच्या विचाराधीन असलेल्या प्रश्नाबाबत निर्णय घेऊन अंमलबजावणी करण्यात आली काय,
(५) असल्यास, अंमलबजावणीचा तपशील काय,
(६) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय,
(२) नाही.
(३), (४) व (५) पैसेवारी पध्दतीचा पुनर्विचार करुन केंद्र शासनाच्या धोरणांच्या अनुषंगाने अभ्यास करण्यासाठी विभागीय आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीचे काम अंतिम टप्प्यात आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औष्णिक विद्युत केंद्रातील चिमणीमधून निघणाऱ्या विषारी सल्फर वायुबाबत**

**(१२) * २७१४ श्री.मितेश भांगडिया, श्री.अनिल सोले :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील औष्णिक विद्युत केंद्राच्या चिमणीमधुन निघणाऱ्या धुरामध्ये आरोग्याला घातक असलेले सल्फरचे प्रमाण आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या औष्णिक विद्युत केंद्राच्या चिमणीतुन निघणाऱ्या सल्फरचे डिसल्फरायझेशन करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या वायुरुपी सल्फरचे पावसाळयातील दमट हवामानात सल्फुरीक ॲसीडमध्ये रुपांतरीत होऊ शकते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विदर्भातील बहुतेक सर्वच औष्णिक विद्युत केंद्र हे शहराला लागुन असल्यामुळे या सर्व चिमण्यांवर फ्लू गॅस डीसल्फरायझेशन (flu gas dsulpherisation) ची प्रक्रीया करण्यात येणार आहे काय,

(५) नसल्यास, कोणती पर्यायी उपाययोजना करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) महानिर्मिती कंपनीला मिळणा-या कोळशामध्ये सल्फरचे प्रमाण अत्यल्प (०.४ ते ०.५%) असते. औष्णिक विद्युत केंद्रामधून उत्सर्जीत होणा-या धुराकरिता उंच (२७५ मी) चिमणी बसविलेली असल्याने त्यातील घटकांचे विकीरण होते परिणामी प्रकल्पाच्या परिसरातील हवेमध्ये असणारे सल्फरडाय ऑक्साईडचे प्रमाण महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने निर्धारित केलेल्या मानाकनांच्या आत असते.

-----------------

**पंढरपूर (जि.सोलापूर) येथील जुन्या बसस्थानक परसिरात घाणीचे साम्राज्य पसरले असल्याने नागरिकांची होत असलेली गैरसोय**

**(१३) * ३७०७ श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथील जुन्या बसस्थानकात स्वच्छता मोहिम राबविली जात नाही तेथे सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले असून बसस्थानकातील महिला व पुरुष स्वच्छतागृहाला टाळे लावल्याने प्रवासी व नागरिकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार सदर बसस्थानकाची स्वच्छता राखणेबाबत तसेच महिला व पुरुषांसाठी असलेल्या स्वच्छतागृहे सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) पंढरपुर (जि.सोलापूर) येथील जुन्या बसस्थानकाची दैनंदिन स्वच्छता आगाराच्या देखरेखीखाली केली जाते व जमा झालेला कचरा नगरपरिषद, पंढरपूर यांच्या कचराकुंडीत जमा केला जातो. तसेच संपूर्ण बसस्थानकावर स्वच्छता मोहिम राबविली जात आहे.

महिला व पुरुष यांचेकरीता पंढरपूर येथील नवीन बसस्थानकावर प्रसाधनगृह प्रवाशांच्या वापराकरीता उपलब्ध असून ते बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वानुसार चालविले जाते. त्याचप्रमाणे श्री. संत तुकाराम महाराज जन्म चतुशताब्दी पंढरपुर विकास आराखडयांतर्गत जुन्या बसस्थानकालगत ७० मी X ३१ मी. इतक्या आकाराच्या जागेत भव्य स्वरुपात प्रसाधन संकूल बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अमरावती जिल्हयातील राज्य परिवहन मंडळाच्या विभागीय कार्यशाळेत यांत्रिकी कर्मचाऱ्यांच्या रिक्त जागा भरण्याबाबत**

**(१४) * ३९१४ श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयातील राज्य परिवहन मंडळाच्या विभागीय कार्यशाळेत यांत्रिकी कर्मचाऱ्यांच्या ७५५ जागा मंजूर असताना ३७७ जागा रिक्त असल्याने बस गाड्या दुरूस्त होऊ शकत नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बसगाड्या तातडीने दुरूस्त व्हाव्यात म्हणून कार्यशाळेतील यांत्रिकी कर्मचाऱ्यांच्या रिक्त जागा तातडीने भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) नाही.
(२) रा.प.अमरावती विभागात विभागीय कार्यशाळा व आगारातील कार्यशाळांकरीता ७५५ यांत्रीकी कर्मचाऱ्यांची मंजुरी असून ४५२ यांत्रिकी कर्मचारी कार्यरत आहेत व ३०३ यांत्रिकी पदे रिक्त आहेत. यापैकी अमरावती विभागीय कार्यशाळेसाठी ३०१ यांत्रिकी कर्मचाऱ्यांची मंजुरी असून ११४ यांत्रिकी कर्मचारी कार्यरत आहेत व १८७ यांत्रिकी पदे रिक्त आहेत. सरळ सेवा भरती २०१४ मध्ये यांत्रिकी पदाकरिता २३ व्यक्तींची नियुक्ती करण्यात आली असून अतिरिक्त यादीवरील २३ जणांची प्रतिक्षा यादी तयार करण्यात आली आहे. रा.प. अमरावती विभागातील सरळसेवा भरती सन २०१२ अंतर्गत अतिरिक्त यादीवर असलेल्या यांत्रिकी प्रवर्गातील सहाय्यक (कनिष्ठ) पदातील उमेदवारांना विभागातील रिक्त जागांनुसार नेमणूका देण्याबाबत व सरळसेवा भरती सन २०१४ अंतर्गत अतिरिक्त यादीवर असलेल्या प्रवर्गातील प्रमुख कारागिर (कनिष्ठ), कारागिर “क” (कनिष्ठ) व सहाय्यक (कनिष्ठ) पदातील मुळ निवड यादीवरील उमेदवार उपलब्ध न झाल्यास अतिरिक्त यादीवरील उमेदवारांना जाहिरातीमधील रिक्त जागांनुसार नेमणूका देण्याबाबत कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. उपलब्ध कर्मचाऱ्यांमार्फत रा.प. गाडयांच्या दुरुस्तीची कामे करुन घेतली जातात.
(३) विलंब झाला नाही.

-----------------

**मावळ (जि.पुणे) तालुक्यात डोंगर पोखरुन मोठ्या प्रकल्पांची होत असलेली उभारणी**

**(१५) * ३१५८ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मावळ (जि.पुणे) तालुक्यात अनेक विकासकांनी मागील काही वर्षापासून डोंगरच विकत घेवून डोंगर पोखरुन मोठ मोठे प्रकल्प उभारण्यात सुरू केल्यामुळे डोंगराच्या पायथ्याशी असलेली अनेक गावे व वसाहती गडप होण्याचा धोका निर्माण झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकासकांकडून पोखरला जात असलेला डोंगराचे काम त्वरीत थांबविण्याबाबत तसेच डोंगरांचे अवैध उत्खन्न करणाऱ्या विकासकावर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) मावळ (जिल्हा पुणे) तालुक्यात डोंगर उतारावर अनधिकृत उत्खननाची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आलेली आहेत, ही वस्तुस्थिती आहे. परंतू डोंगर विकत घेऊन, डोंगर पोखरुन मोठमोठे प्रकल्प उभारण्यास सुरु केल्यामुळे डोंगराच्या पायथ्याशी असलेली अनक गावे व वसाहती गडप होण्याचा धोका निर्माण आहे, असे निदर्शनास आले नाही.

(२) व (३) मावळ तालुक्यात डोंगर उतारावरील अनधिकृत उत्खननाबाबत दंडात्मक कार्यवाही तहसिलदार मावळ यांच्यामार्फत करण्यात आली असून २ प्रकरणी संबंधिताकडून रक्कम रु. ८७,७४,५००/- इतका दंड वसूल करुन घेण्यात आला आहे आणि अन्य २ प्रकरणी एकूण रु. ४५,८४,५००/- दंड वसूलीसाठी संबंधितांना नोटीस बजाविण्यात आली आहे.

-----------------

**मुंबई-अहमदाबाद महामार्गासाठी रूंदीकरण व चौपदरीकरणासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला मिळाला नसल्याबाबत**

**(१६) * ३२३८ श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-अहमदाबाद महामार्गाचे रूंदीकरण व चौपदरीकरण करण्यासाठी संपादित केलेल्या जमिनीचा आदिवासी शेतकऱ्यांना मोबदला अद्यापपर्यंत मिळालेला नसल्याने १२ गावांतील शेकडो आदिवासी संतप्त झाले असल्याने आदिवासी पुनर्वसन आंदोलन समितीतर्फे स्वातंत्रसैनिक, निवृत्त तहसीलदार रा.वि.भुस्कुटे यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी तीव्र आंदोलन केले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी अनेक वर्षापासून मोबदला मिळविण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व उपविभागीय आधिकारी डहाणू यांच्याकडे लेखी तक्रार व अनेकवेळा आंदोलन करूनसुध्दा दखल घेतली नसल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने रितसर चौकशी केली असता अदिवांसींना जमिनीचा मोबदला तातडीने देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करणार आहे,
(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशतः खरे आहे.

आदिवासी पुनर्वसन आंदोलन समितीने प्रथम दि. १८ मे. २०१२ रोजी व नंतर फेब्रुवारी, २०१४ मध्ये आंदोलन केले होते.
(२) हे खरे नाही.

आदिवासी पुनर्वसन आंदोलन समिती यांचेशी वेळोवेळी चर्चा करण्यात येऊन त्यांनी उपस्थित केलेल्या शंकाचे निरसन जिल्हाधिकारी, पालघर, ठाणे, उपविभागीय अधिकारी, डहाणू, व्यवस्थापक (तांत्रिक) भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पी.आय.यु. सुरत (एक्सप्रेसवे) यांचेकडून करणेत आले आहे.
(३) उपविभागीय अधिकारी, डहाणू यांचे अध्यक्षतेखालील दि.१६/६/२०१२ रोजीच्या बैठकीस तहसिलदार, पालघर, समितीचे प्रतिनिधी व प्राधिकरणाचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यावेळी ४१ खातेदारांनी सादर केलेल्या अर्जाची तपासणी करण्यात येऊन प्राप्त अभिलेखानुसार सदर ४१ खातेदारांना मोबदला देण्यात आल्याचे व्यवस्थापक (तांत्रिक) भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पी.आय.यु.सुरत यांनी त्यांच्या अहवालात नमूद केलेले आहे. भूधारकाशी याबाबत संवाद साधून सहापदरीकरणाचे काम जवळ जवळ पूर्ण करण्यात आले आहे. तसेच याभागातील सहा पदरीकरणांच्या निवाडयाचे वाटपही बहुतांशी पूर्ण करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**परभणी जिल्ह्यातील महसूल विभागातील रिक्त पदांबाबत**

**(१७) * २८०७ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील नायब तहसिलदार, अव्वल कारकून, मंडळ अधिकारी, लिपिक, तलाठी व इतर पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रिक्त पदांमुळे कार्यरत असणाऱ्या इतर कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त जबाबदारी देण्यात येत असल्याने त्यांच्यावर कामाचा मोठा ताण तसेच जनतेस अडचण निर्माण होत असल्याबाबत विविध वृत्तपत्रांनी सन २०१४-१५ च्या दरम्यान त्याकडे शासनाचे लक्ष वेधले आहे काय,
(३) असल्यास, महसूल विभागाच्या निकष व मानकाप्रमाणे रिक्त पदे भरण्याबाबत शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, किती मुदतीत ही रिक्त पदे भरण्यात येणार आहेत,
(५) अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) परभणी जिल्ह्यातील नायब तहसिलदाराची सर्व रिक्त पदे भरण्यात आली असून अव्वल कारकून-८, मंडळ अधिकारी-५, लिपीक-१४, तलाठी-२२, वाहन चालक-१ व शिपाई-३० अशी एकूण ८० परे रिक्त आहेत.

(२), (३) व (४) सदर रिक्त पदांमुळे कार्यरत असणा-या इतर कर्मचा-यांवर अतिरिक्त जबाबदारी देण्यात येत असल्याने त्यांच्यावर कामाचा थोडा ताण वाढत आहे, ही वस्तुस्थिती आहे. तथापि, उपरोक्त रिक्त असलेली पदे जुलै, २०१५ पर्यंत नियमानुसार पदोन्नतीने अथवा भरती प्रक्रियेतून भरण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर सुरु आहे.

(५) पश्न उद्भवत नाही.

-----------------

**ता.देगलूर, जि.नांदेड येथील रामपूर रोडवरील विद्युत वितरण कंपनीच्या वीज खांबावरील तारा लोंबकळत असल्याने निर्माण झालेला धोका**

**(१८) * ४३९७ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देगलूर (ता.जि.नांदेड) येथील रामपूर रोडवरील गोळवलकर विद्यालयाकडे जाणा-या रस्त्यावर विद्युत वितरण कंपनीच्या वीज खांबावरील तारा लोंबकळत खाली आल्याने या रस्त्यावरुन जाणा-या विद्यार्थ्यांच्या जीवीताला धोका निर्माण झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित महावितरण या बाबीकडे लक्ष देत नसल्याने नागरिकांच्या प्रामुख्याने विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात आला आहे हे पाहता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) सदर बाब निदर्शनास आल्यानंतर दि. १८.०२.२०१५ रोजी त्वरीत त्या वीज वाहिनीच्या सुव्यवस्थेचे कामे पुर्ण करुन व्यवस्थित करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भंडारा जिल्ह्यात नदीघाटाची लिलावाची मुदत संपवूनही अवैध वाळू उपसा सुरू असल्याबाबत**

**(१९) * ४५१९ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यात नदीघाटाची वाळू उपसा करणाऱ्या लिलावाची मुदत दिनांक २१ सप्टेंबर, २०१४ रोजी वा त्यादरम्यान पर्यंतच होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या लिलाव पद्धतीला पर्यावरण विभागाने आक्षेप घेतला असताना देखील महसूल विभागाने लिलावास परवानगी दिली, हे खरे आहे काय,

(३) लिलावाची दिनांक २१ सप्टेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास ची मुदत संपल्यानंतर या ठिकाणी अवैधरित्या वाळू उपसा होत असल्याच्या तक्रारी विविध सामाजिक संघटनांनी जिल्हाधिकारी, भंडारा यांना निवेदनाव्दारे दिल्या, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या तक्रारीची जिल्हा प्रशासनाने कोणती दखल घेतली आहे,
(५) या प्रकरणी दखल घेतली नसल्यास त्याची कारणे कोणती ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) सन २०१३-१४ या वर्षाकारिता घेण्यात आलेल्या वाळू/रेती लिलावाचा कालावधी राज्याच्या वाळू/रेती निर्गती धोरणानुसार भंडारा जिल्हयात ही दिनांक ३० सप्टेंबर, २०१४ पर्यंत होता.
(२) अशी वस्तुस्थिती नाही.
(३) व (४) अखिल भारतीय भ्रष्टाचार विरोधी सामाजिक न्याय मंच यांची दिनांक २०/१०/२०१५ रोजीची तक्रार जिल्हाधिका-यांकडे प्राप्त झाली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने अवैध वाळू उत्खनन व वाहतूकीसंदर्भात सत्वर कारवाई होण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली पोलीस व परिवहन विभागाची बैठक घेऊन, सदर तक्रार भंडारा तालुक्याशी संबंधित असल्याने उपविभागीय अधिकारी भंडारा व तहसिलदार भंडारा यांना आवश्यक कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात आल्या होत्या. तहसिलदार भंडारा यांनी माहे ऑक्टोंबर २०१४ ते डिसेंबर २०१४ या कालावधीत गौण खनिजाच्या ५११ अवैध वाहतूकीच्या प्रकरणात सुमारे रुपये ४८ लक्ष इतका दंड वसूल केला आहे. तसेच अवैध रेती व इतर गौण खनिज वाहतूकीच्या एकूण ६५ प्रकरणांमध्ये फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील अवैधरित्या होत असलेला रेती उपसा**

**(२०) * ४५९९ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बंदी असूनही ठाणे, रत्नागिरी, पेण (जि.रायगड) व मालवण (जि.सिंधुदुर्ग) येथील समुद्रकिनारी व नदीपात्रामध्ये तसेच खाडीमध्ये राजरोसपणे बेकायदेशिररित्या वाळू माफियांकडून वाळू उत्खनन व वाहतुक प्रचंड प्रमाणात होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास रात्रीच्या वेळी अंधारात होणाऱ्या बेकायदा वाळू उत्खनन व वाहतुकीमुळे स्थानिक ग्रामस्थांना अपघात व चोरीच्या घटनांना तोंड द्यावे लागत असल्याने तेथील ग्रामस्थांनी दिनांक १२ जानेवारी च्या सुमारास मा.जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग, तहसिलदार, मालवण यांचेकडे लेखी तक्रार दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, या रेती माफियाविरोधात मेरीटाईम बोर्डाने कारवाई करावी तसेच खाडी व नदी किना-याचे संरक्षण करावे असे आदेश नॅशनल ग्रीन ट्रिब्युनलने २०१४ मध्ये दिलेले आहेत तरीही त्याची योग्य प्रकारे अंमलबजावणी झालेली नाही, व त्याकडे मेरी टाईम बोर्डाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अद्यापपर्यंत स्थानिक महसुल प्रशासन व वाळू माफिया यांच्या संगनमताने एकाही वाळू माफियाविरोधात कुठल्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास बेकायदेशीररित्या वाळू उत्खनन व वाहतूक केल्याने शासनाचे कोट्यावधी रूपयांचे नुकसान करणाऱ्या वाळूमाफियांवर तसेच, महसुल प्रशासनाच्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) रेती उपसा करणा-या वाळू माफियांचा कायमस्वरुपी बंदोबस्त करण्याच्या दृष्टीने शासनाने अद्याप कारवाई केली नसल्यास याबाबत विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) प्रश्नाधिन भागात वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतूकीची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आली आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

(२) तहसिलदार मालवाण यांच्याकडे अनधिकृत वाळू उपशाबाबत ग्रामस्थांनी दिनांक १२/०१/२०१५ रोजीची तक्रार प्राप्त झाली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने वाळूचे अनधिकृत उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी रात्रीची गस्त घालण्यात येत असून अनधिकृत उत्खनन व वाहतुक आढळून आल्यास दंडात्मक तसेच फौजदारी स्वरुपाची कार्यवाही करण्याची तजवीज ठेवली आहे.

(३) मा. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, पश्चिम विभाग, खंडपीठ पुणे येथे दाखल अर्ज क्रमांक ३४ (THC)/२०१३(WZ) (आवाज फाऊंडेशन व इतर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर) मध्ये मा. न्यायाधिकरणाने दिनांक २९.५.२०१४ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्रात नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी वाळू/रेतीचे उत्खनन करण्याबाबतचे धोरण निश्चित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) असे निदर्शनास आले नाही.

(५) व (६) ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग या जिल्हयात गौध खनिजांचे अवैध उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी तालुका व जिल्हा स्तरावर भरारी पथके गठीत करण्यात आलेली आहेत. सदर पथकांनी केलेल्या तपासणीत सन २०१४-२०१५ या वर्षात ठाणे जिल्हयात गौध खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीचया ७४५ प्रकरणात रुपये १,६६,३४,०००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे रत्नागिरी जिल्हयात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीच्या ३०५ प्रकरणात कामे ४७८६८०३/- इतका दंड वसूल करुन ८ प्रकरणांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

तसेच पेण तालुक्यात सन २०१४-२०१५ या वर्षात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या ३७ प्रकरणात रुपये ४५,४५,९९७/- इतका दंड वसूल करण्यात आला असून, ४ प्रकरणांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

मालवण तालुक्यात मार्च २०१४ पासून १२३ प्रकरणांत रुपये २३,३६,८८७/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे. तसचे वाळू/रेतीचे अवैध उत्खनन करण्यासाठी वापरात येत असलेल्या चार बोटींना सिल केले असुन, ७२ रॅम्प निकामी केले आहेत.

-----------------

**खालापूर (जि.रायगड) तालुक्यात संपादित केलेल्या जमिनीचा आदिवासी शेतकऱ्यांना मोबदला देण्याबाबत**

**(२१) * ४६६३ श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यात ॲडलॅब वॉटर पार्क (इमॅजिका) ची उभारणी करतेवेळी आदिवासींच्या जमिनी संपादित केल्या आहेत तसेच त्यांची घरे मोडले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जमिनी संपादित करतेवेळी शासनामार्फत आदिवासींना नोटीसाही दिल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्यांच्या जमिनी संपादित करण्यांत आल्या त्या आदिवासीं शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्यांत आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(५) आदिवासी शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला त्वरित देण्याबाबत व त्याचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) सदर प्रकल्पासाठी शासनाकडून रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील कोणतीही जमीन संपादित करण्यात आलेली नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**धुळे-सोलापूर राष्ट्रीय मार्गावर झालेल्या अपघातातील मृतांच्या कुटुंबियांना व जखमींना आर्थिक मदत मिळणेबाबत**

**(२२) * ४७६१ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे-सोलापूर राष्ट्रीय मार्गावर चोराखळी नजीकच्या वळण रस्त्यावर ट्रक व एस.टी.बस समोरासमोर येऊन माहे जानेवारी, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान झालेल्या अपघातात ४ जण ठार तर २१ जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार मृतांच्या कुटुंबियांना तसेच जखमींना आर्थिक मदत करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे अंशत: खरे आहे.

दिनांक ९.१.२०१५ रोजी सोलापूर विभागातील तुळजापूर आगाराची बस क्र.एमएच-१४ बीटी २१६४ ला चोराखळी पासून २ कि.मी.वर आली असता विरुध्द दिशेने येणारा मालट्रक क्र.आरजे-०७ जीए-४१२४ ने रा.प. बसला समोरुन धडक दिली व अपघात झाला. सदर अपघातात ४ रा.प. प्रवासी, रा.प.चालक असे ५ जण मृत व २१ रा.प.प्रवासी जखमी झाले.

(२) व (३) सदर अपघाताची पोलीस स्टेशन, येरमाळा यांनी चौकशी केली असून या चौकशीत सदर अपघातास मालट्रक चालकास जबाबदार धरले आहे. पोलीसांनी ट्रक चालकाविरुध्द गुन्हा रजिस्टर क्र. ९/१५ नुसार भा.दं.वि. कलम ३०४ (अ), २७९, ३३७, ३३८ व १८४ या कलमान्वये गुन्हा दाखल केलेला आहे. या अपघाताच्या रा.प. खात्याने केलेल्या चौकशीत देखील सदर अपघातास ट्रक चालक जबाबदार असल्याचे निष्पन्न झाले आहे.

अपघातग्रस्त ५ मृतांपैकी ३ मृतांचे नातेवाईकांना रा.प. महामंडळातर्फे नियमानुसार प्रत्येकी १०,०००/- प्रमाणे एकूण रुपये ३०,०००/- तात्कालीक मदत देण्यात आली. १ मृताचे नातेवाईकांनी आर्थिक तात्कालीक मदत घेण्यास नकार दिला. तसेच २१ जखमींपैकी १६ जखमी प्रवाशांना प्रत्येकी रुपये १,०००/- व १ प्रवाशास रुपये ५००/- असे एकूण १६,५००/- असे एकंदर रुपये ४६,५००/- ची आर्थिक तात्कालीक मदत देण्यात आली आहे. तसेच अपघात नुकसान भरपाईसाठीचे 'पी' फॉर्म देण्यात आले. १ रा.प.प्रवाशी अपघात स्थळावरुन परस्पर निघून गेल्याने त्यास आर्थिक तात्कालीक मदत देता आली नाही. २ जखमी रा.प. प्रवाशांनी आर्थिक तात्कालीक मदत घेण्यास नकार दिला. उर्वरित १ गंभीर जखमी रा.प. प्रवासी दवाखान्यात दाखल होऊन वैद्यकीय उपचार घेत असल्याने त्यास आर्थिक तात्कालीक मदत देण्यात येत आहे.

सदर अपघातात मृत झालेले रा.प. कामगिरीवरील चालक कामगार नुकसान भरपाई कायदा १९२३ नुसार अपघात नुकसान भरपाईस पात्र असल्याने त्यांचे वारसदारास धनादेश क्र. २५२६०७, दिनांक ६.२.२०१५ नुसार रुपये ५,८९,८००/- ची रक्कम नुकसान भरपाईसाठी अदा करण्यात आलेली आहे.

अद्यापपावेतो कोणीही मृताचे वारसदाराकडून 'पी' फॉर्मद्वारे रा.प. महामंडळाकडे अपघात नुकसान भरपाईची मागणी करण्यात आलेली नाही. मात्र, १ जखमी रा.प. प्रवाशाकडून 'पी' फॉर्मद्वारे अपघात नुकसान भरपाईची मागणी करण्यात आलेली असून त्यावर कार्यवाही करण्यात येत आहे. एका मृताच्या वारसदाराने उस्मानाबाद कोर्टात एमएसीपी क्र. १५/१५ नुसान १.५० कोटीचा (दीड कोटी) दावा दाखल केलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे गोवर्धन, महादेवपूर, गंगापूर व पाथर्डी (ता.जि.नाशिक) या मिळकतीबाबत कुळकायदा कलम ६३ चे उल्लंघन झाल्याबाबत**

**(२३) * ४८१२ श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गोवर्धन, महादेवपूर, गंगापूर व पाथर्डी (ता.जि.नाशिक) या मिळकतीबाबत कुळकायदा कलम ६३ चे उल्लंघन झाल्याने अधिनियम व नियमातील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करण्याचा शासनाने माहे जून, २०१४ मध्ये निर्णय घेऊनही सदर प्रकरणी माहे जानेवारी, २०१५ पर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने दिलेल्या आश्वासनाप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जुलै, २०१४ मध्ये जिल्हा प्रशासनास निवेदन दिलेले होते, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) प्रश्नांधिन प्रकरणी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने, जिल्हाधिकारी, नाशिक यांनी उपविभागीय अधिकारी, नाशिक व उपविभागीय अधिकारी, इगतपुरी-त्र्यंबकेश्वर यांना चौकशी करण्याचे दि.२०.२.२०१४ रोजी निर्देशीत केले होते. त्यानुसार याप्रकरणी चौकशी करुन तक्रारीत नमूद मिळकतींच्या संदर्भात हस्तांतरण होऊ नये, व त्रयस्थ पक्षांचे हितसंबंध निर्माण होवू नये, म्हणुन उपविभागीय अधिकारी नाशिक यांनी दि. २०/५/२०१४ रोजीच्या आदेशान्वये, सदर मिळकतींच्या अधिकार अभिलेखात पुढील आदेश होईपावेतो "जेथे थे" परिस्थिती ठेवण्याचे आदेश पारीत केले आहेत.

तसेच, उपविभागीय अधिकारी, इगतपुरी-त्र्यंबकेश्वर यांनी संबंधित फेरफार नोंद स्वाधिकारे पुनरिक्षणात घेतली असून, सदर प्रकरणी अंतिम निर्णय होईपर्यंत मौजे कुर्णोली, ता.इगतपुरी येथील गट क्र. १२९ या मिळकतीत कोणत्याही फेरफारची नोंद करण्यात येवू नये, यासाठी दि. ९.६.२०१४ रोजी स्थगिती आदेश पारित केलेले आहेत. तसेच तहसिलदार, इगतपुरी यांना सदर मिळकतीसंदर्भात महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ च्या कलम- ८४ अन्वये कार्यवाही करण्याबाबत सूचित केलेले आहे.

-----------------

**राज्यात विशेषत: विदर्भातील शेती पिकाची जुन्याच पध्दतीने आणेवारी काढल्याबाबत**

**(२४) * ५१५१ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: विदर्भात मोठया प्रमाणात शेती पिकांचे पाण्याअभावी नुकसान होवूनही वास्तव्य स्थिती न बघता बिट्रीशकालीन आणेवारी पध्दतीमुळे म्हणजे जुन्याच पध्दतीने आणेवारी काढून तसा अहवाल शासनाकडे सादर केल्यामुळे विदर्भातील शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्याचे दिनांक २ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर्षी विदर्भात अल्पसा पाऊस पडल्याने शेतकऱ्यांचे हाती ३० टक्केही पिक न आल्याचे वास्तव्य पूढे आले असूनही शासन ही आणेवारी पध्दत बदलणार करणार आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

(२) पैसेवारी पध्दतीचा पुनर्विचार करुन केंद्र शासनाच्या धोरणांच्या अनुषंगाने अभ्यास करण्यासाठी विभागीय आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीचे काम अंतिम टप्प्यात आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुणे जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांना वीज बिल घरगुती दराने मिळण्याबाबत**

**(२५) * ५४२९ श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या जवळपास सर्वच शाळा संगणकयुक्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संगणकयुक्त झालेल्या शाळांना यापूर्वी व्यावसायिक दराने वीज बिल आकारणी केली जात होती, परंतु आता सार्वजनिक सेवा दराने वीज बिल आकारणी केली जात आहे परंतु व्यावसायिक दर व सार्वजनिक सेवा दरात फारशी तफावत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) बऱ्याच शाळांची आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे व वीज बिल ५०० रुपयांपेक्षा जास्त येत असल्यामुळे शाळा वीज बिल भरु शकत नाही त्यामुळे शाळेची वीज जोडणी तोडली जाते, हे ही खरे आहे काय,

(४) सदर शाळांसाठी वीज बिल घरगुती दराने मिळावे अशी मागणी आंबेगाव तालुका प्राथमिक शिक्षक संघाने दिनांक १२ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे व तेथील लोकप्रतिनिधींकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, यावर शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) नाही.

(२) अंशतः खरे आहे.

(३) जिल्हापरिषद शाळांनी वीज बील थकबाकी भरल्यास नियमाप्रमाणे वीज पुरवठा तात्पुरता स्वरुपात खंडीत करण्यात येतो.

(४) नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील अल्पसंख्यांक समाजातील मुलींना शाळेतील उपस्थितीकरिता प्रोत्साहन भत्ता देण्याबाबत**

**(२६) * ५४९३ श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळांमध्ये वर्ग ५ ते ७ मध्ये अल्पसंख्यांक मुलींची उपस्थिती राहण्याच्या दृष्टीने प्रोत्साहन भत्ता देण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक दिवसांपासून तो प्रोत्साहन भत्ता देण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तो भत्ता मिळावा यासाठी मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांना दिनांक ६ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास अमरावती विभाग शिक्षक आघाडीच्या वतीने निवेदनाद्वारे मागणी केली गेली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, तो प्रोत्साहन भत्ता अल्पसंख्यांक मुलीना देण्याविषयी शासनाची भुमिका काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) नाही, दिनांक २७/०१/२०१४ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे राज्यातील वरीष्ठ प्राथमिक शाळांमध्ये (इ.५ वी ते ७ वी) शिक्षण घेत असणा-या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थी/विद्यार्थिनीच्या शाळेतील उपस्थिती करीता त्यांच्या पालकांना प्रोत्साहन भत्ता देण्याची योजना सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षापासून बंद करण्यात आली आहे.
(३) होय.
(४) अल्पसंख्यांक विकास विभागामार्फत सन २००८-०९ या वर्षापासून राबविण्यात येत असलेल्या राज्यातील वरीष्ठ प्राथिमक शाळांमध्ये (इयत्ता ५ ते ७वी) शिक्षण घेत असणा-या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थी / विद्यार्थीनींच्या शाळेतील नियमित उपस्थितीकरिता त्यांच्या पालकांना प्रोत्साहन भत्त्यापोटी (प्रतिदिन रु.२/- याप्रमाणे २२० शालेय दिवसाकरिता रु.४४०/- एवढा प्रोत्साहन भत्ता) देण्यात येणारी रक्कम अगदीच तुटपुंजी असल्याने व ही योजना तितकीशी परिणामकारक नसल्याचे आढळून आल्याने ती बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. (त्यामुळे प्रोत्साहन भत्ता देण्याबाबत प्रश्न उद्‌भवत नाही.)

-----------------

## महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघाचे (महानंदा) सदस्य असलेल्या दूध संघांना महानंदला नियमितपणे दूध पुरवठा करण्याबाबत

**(२७) * ५५४३ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघाचे (महानंदा) सदस्य असलेल्या दूध संघांना महानंदला नियमितपणे दूध पुरवठा करणे बंधनकारक असतानाही राज्यातील १०५ पैकी तब्बल ७६ दूध संघांनी महानंदला नियमितपणे दूध पुरवठा केला नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दूध संघाकडून दूध पुरवठा होत नसल्याने महानंदला बाजारातून जादा दराने दूध खरेदी करावे लागत असल्याने महानंदला गेल्या एका वर्षातच ५४ कोटी रुपयांचा तोटा झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ज्या दूध संघानी महानंदला दूधाचा पुरवठा केला नाही त्यांच्यावर कोणती कारवाई केली आहे, अद्याप याबाबत दूध संघावर कोणतीच कारवाई केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) महासंघास दूध पुरवठा करणा-या सदस्य संघाना नियमितपणे दूध पुरवठा करण्याबाबत महासंघामार्फत दि. १९/०१/२०१५ रोजीच्या पत्रान्वये निदेश देण्यात आले आहेत. त्यानुषंगाने १५ सदस्य संघांकडून खुलासे प्राप्त झाले असून उर्वरितांकडून अद्यापि खुलासे प्राप्त झाले नाहीत.

-----------------

**मेशी (जि.नाशिक) तालुक्यात गारपीटीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळण्याबाबत**

**(२८) * ५६९४ डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेशी तालुक्याच्या (जि.नाशिक) पूर्व भागातील मेशी, महालपाटणे, निबोंळा, वासोळपाडे, देवपूरपाडे, वासोल या गारपीटग्रस्त गावात शेतपीक व फळपिकांचे नुकसान झाले असल्याचे दिनांक १४ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या आपत्तीग्रस्त शेतक-यांना दिलासा देण्यासंदर्भात काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाशिक जिल्ह्यातील देवळा तालुक्यातील मेशी गावासह एकूण ११ गावात दि.११ व १२ डिसेंबर, २०१४ रोजी गारपीट झाल्याने शेती व फळपिकांचे नुकसान झाले आहे.

(२) व (३) माहे नोव्हेंबर व डिसेंबर, २०१४ मध्ये गारपीट व अवेळी पावसामुळे नुकसान झालेल्या आपदग्रस्तांना विशेष स्वरूपात मदत देण्याबाबत दि.४ फेब्रुवारी, २०१४ रोजी शासनाने निर्णय घेतला आहे. त्यानुसार मदत देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

**सिल्लोड तालुक्यातील (जि.औरंगाबाद) एका तडवी नामक आदिवासीची बिगर आदीवासीकडे हस्तांतर केलेली जमीन परत करण्यासंदर्भात**

**(२९) * ६०४४ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्लोड तालुक्यातील (जि.औरंगाबाद) एका तडवी नामक आदिवासीची बिगर आदीवासीकडे हस्तांतर करण्यात आलेली जमिन परत करण्यासंदर्भात प्राप्त अर्जावरील कार्यवाही अंतर्गत जमीन हस्तांतरण प्रकरण हे सन १९७४ नंतरचे असल्याच्या कारणावरुन आदिवासींच्या विरोधात निर्णय पारीत झालेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९७४ नंतर आदिवासींची जमीन बिगर आदीवासींकडे हस्तांतर झाली असल्यास महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम १६ व १६-अ चा भंग झाल्याने त्यातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्याची तरतूद असताना आदिवासींचा हक्क डावलण्यासाठी हेतूतः लागू नसलेल्या कायद्याखाली प्रकरण चालवण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आदिवासींना महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ३६ व ३६-अ मधिल तरतूदीनुसार त्यांची हस्तांतरीत जमिन परत करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यार्पित करण्यासाठीचा अधिनियम १९७४ अन्वये दिनांक ०१.०४.१९५७ ते ०६.०७.१९७४ या कालावधीतील अनुसूचित जमातीच्या व्यक्तींच्या जमिनीचे हस्तांतरण अनुसूचित जमातीतील व्यक्तीस प्रत्यार्पित करता येतात. मात्र महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ३६-अ (४) नुसार महाराष्ट्र जमिन महसूल संहिता आणि कूळवहिवाट (सुधारणा) अधिनियम १९७४ याच्या प्रारंभीच्या वेळी किंवा तद्‌नंतर सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेशिवाय जमीन हस्तांतरीत झाली असल्यास जिल्हाधिकारी स्वाधिकारे अथवा अशा वहिवाटीमधील हितसंबंधीत व्यक्तीच्या अर्जावर चौकशी करुन निर्णय घेण्याबाबत तरतूद आहे.

प्रश्नाधीन प्रकरणी संबंधित महसूल अधिकाऱ्यांनी पारित केलेल्या आदेश व अभिलेख यांची पडताळणी करुन महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ च्या तरतूदीनुसार आवश्यक ती उचित कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**मौ.हाळी खुर्द पाझर तलाव क्र.११ (ता.चाकूर, जि.लातूर) येथील जमीन भूसंपादनांतर्गत फळझाडांचे मूल्यांकन करण्याबाबत**

**(३०) * ६१३६ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.हाळी खुर्द पाझर तलाव क्र.११ (ता.चाकूर, जि.लातूर) येथील जमीन भूसंपादना अंतर्गत फळझाडे, वनझाडे व बांधकामे यांचे मुल्यांकन करण्यात आले नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील मुल्यांकनासाठी विशेष भूसंपादन अधिकारी, स्वर्णा प्रकल्प, लातूर यांनी दिनांक २० जानेवारी, २०१० रोजी जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, लातूर, कार्यकारी अभियंता, लातूर, उपविभागीय वन अधिकारी, उस्मानाबाद यांना फळझाडे/वनझाडे, बांधकाम व इतर यांचे मूल्यांकन करून अहवाल पाठविण्यास सांगितले असूनही अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली असल्यास जमीन भूसंपादन मुल्यांकनाचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(४) असल्यास, शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही. मौजे हाळी खूर्द पाझर तलाव क्र. ११ ता.चाकूर, जि.लातूर येथील जमीन भू-संपादनाअंतर्गत फळझाडांचे मुल्यांकन कृषी विभागाकडून करण्यात आलेले आहे.

(२) हे खरे नाही. मौजे हाळीखूर्द पाझर तलाव क्र. ११ ता.चाकूर येथील संपादीत जमिनीतील फळझाडांचा मुल्यांकन अहवाल दिनांक १४/१०/२००८ रोजी, वनझाडांचा मुल्यांकन अहवाल दिनांक २१/८/२००७ रोजी व बांधकामाचा मुल्यांकन अहवाल दिनांक २१/४/२००७ रोजी विशेष भुसंपादन अधिकारी (स्वर्णा प्रकल्प), लातूर यांना सादर करण्यात आलेला आहे.

(३) व (४) मौजे हाळीखूर्द पाझर तलाव क्र. ११ ता.चाकूर येथील संपादीत जमीनीस सन २००८ च्या शिघ्रसिध्दगणकानुसार रु. १.०० लाख प्रति हेक्टर एवढा दर निश्चित करण्यात आलेला असून त्यानुसार संपादीत जमीनीची किंमत रु. ४,०१,७२०/- आहे. सदर निवाडा दिनांक २१/०१/२०११ रोजी जाहीर करण्यात आला.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे वाळूज (ता.गंगापूर जि.औरंगाबाद) येथे शॉर्ट सर्किट होऊन ऊस जळून खाक झाल्याने आर्थिक मदत मिळण्याबाबत**

**(३१) * ६१४६ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वाळूज (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) येथे शॉर्ट सर्किट होऊन ३० एकरामधील ऊस जळून खाक झाल्याची घटना दिनांक १५ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार आपदग्रस्तांना आर्थिक मदत देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशत: खरे आहे.

शॉर्ट सर्कीटमुळे आग लागली नसून मधमाश्यांचे मोहळ धूर करुन उठवत असताना आग लागली आहे.

(२) होय.

(३) महावितरण कंपनीचे सहाय्यक अभियंता यांनी घटनास्थळाची पाहणी केली असता पाहणीत असे आढळून आले की, मधमाश्यांचे मोहळ धूर करुन उठवत असताना ही आग लागली असून सदरील आग लागलेल्या ठिकाणापासून १००० फुटाच्या परिसरात महावितरणाची कुठलाही लघु दाब किंवा उच्च दाब वाहीनी व रोहीत्र नाही. दिनांक १५.०२.२०१५ रोजी दुपारी १.०० वाजता आग लागली असा उल्लेख असून ११ केव्ही धामोरी फिडर वर दिनांक १५.०२.२०१५ रोजी सकाळी ९.३० ते दुपारी ३.३० वाजेपर्यंत भारनियमन अस्तित्वात होते. या संदर्भात एकाही शेतक-याने महावितरण कार्यालयात अद्याप लेखी अथवा तोंडी स्वरुपात तक्रार केलेली नाही.

सदर घटनेत महावितरण कोणत्याही प्रकारे जबाबदार नसल्यामुळे आपदग्रस्तांना आर्थिक मदत देण्यात आली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वरुड (जि.अमरावती) तालुक्यात मोठ्या प्रमाणात होत असलेली रेतीची तस्करी**

**(३२) * ६१६७ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरुड (जि.अमरावती) तालुक्यात रेती उत्खननाचे सर्व नियमांचे उल्लंघन करुन मोठ्या प्रमाणात रेतीची तस्करी होत असल्यामुळे शासनाच्या कोट्यवधीचा महसूल बुडत आहे. तसेच रेती तस्करीबाबत घोराड येथील तहसिलदारांकडे व उपविभागीय अधिकारी यांचेकडे अनेकदा तक्रारी करून ही अद्याप संबंधितावर कोणतीच कार्यवाही झाली नसल्याचे दिनांक १ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने यासंदर्भात चौकशी करुन कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) असे निदर्शनास आले नाही. मात्र, अमरावती जिल्ह्यातील वरुड तालुक्यात गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी भरारी पथके गठीत करण्यात आलेली असून, सदर भरारी पथकांनी सन २०१४-१५ मध्ये गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या ५६ प्रकरणांत रुपये ८,२१,०९६/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

-----------------

## मुर्तिजापूर (जि.अकोला) तालुक्यातील जाहिर झालेली मदत बागायती शेतकऱ्यांना निकषांप्रमाणे मिळण्याबाबत

**(३३) * ५१९७ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुर्तिजापूर (जि.अकोला) तालुका दुष्काळग्रस्त जाहीर झाला असून सर्वच पिके शेतकऱ्यांच्या हातून गेलेली असल्याने कोरडवाहूसाठी ४ हजार ५०० रुपये तर बागायतदारांसाठी ९ हजार रुपये मदत शासनाने जाहिर केली, मात्र बागायती शेतकऱ्यांची नावे कोरडवाहूंच्या यादीत आल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत दुष्काळग्रस्तांना जाहिर झालेली मदत बागायती शेतकऱ्यांना निकषांप्रमाणे मिळावी अशी मागणी तेथील शेतकऱ्यांनी तहसिलदारांकडे निवेदनाव्दारे केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही.

(२) व (३) होय, बागायती शेतक-यांना शासनाच्या निकषानुसार मदत देण्याबाबतची मागणी तहसिलदार मुर्तिजापूर यांना निवेदनाद्वारे करण्यात आली होती. खरीप हंगामातील बाधित शेतक-यांची यादी देय रकमेसह ग्राम पंचायत कार्यालयात प्रसिध्द करण्यात येऊन त्यावर आक्षेप मागविण्यात आले होते. तथापि विहीत मुदतीत कुठल्याही प्रकारचे आक्षेप प्राप्त झाले नाहीत. त्याअनुषंगाने पात्र लाभार्थ्यांच्या बॅक खात्यावर अनुदान जमा करण्यात आली.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात सर्वच जिल्ह्यात पावसाचा अनियमितपणा, गारपीट, अवकाळी पाऊस, इत्यादीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात झालेले नुकसान**

**(३४) * ३४५४ श्री.संदिप बाजोरिया, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.आनंद ठाकूर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.रामराव वडकुते, श्री.गोपिकिशन बाजोरीया, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.जयवंतराव जाधव, प्रा.जोगेन्द्र कवाडे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: विदर्भातील सर्व जिल्ह्यात, नांदेड जिल्ह्यातील हातगाव तालुक्यातील मनाळा परिसर, सांगली, मंगळवेढा (जि.सोलापूर), ता.महागाव (जि.यवतमाळ) व वाशिम जिल्ह्यांत माहे डिसेंबर, २०१४ ते जानेवारी, २०१५ या कालावधीत झालेला अवकाळी पाऊस, गारपीट, सावकाराचे कर्ज, दलालांचे कमिशन, व्यापाऱ्याची पिळवणूक इत्यादीमुळे शेतकऱ्यांचे खरीप व पेरणी केलेल्या रब्बी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, नुकसान झालेल्या पिकांसाठी शासनाने राज्यभरातील शेतकऱ्यांसाठी तब्बल ४ हजार ८०३ कोटी रूपयांचा निधी मंजूर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास सदर नुकसानीची शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(४) असल्यास पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार नुकसान भरपाई देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) माहे डिसेंबर, २०१४ ते जानेवारी, २०१५ या कालावधीत राज्यात पडलेला अवकाळी पाऊस, गारपीट इत्यादी कारणामुळे रायगड, सांगली, सातारा, पुणे, नाशिक, धुळे, जळगांव, अहमदनगर, नंदुरबार, अकोला, अमरावती, बुलढाणा व वाशिम या जिल्ह्यात सुमारे ४२७०३.४५ हेक्टर क्षेत्रात शेती/फळपिकांचे नुकसान झाले आहे. नांदेड, सोलापूर यवतमाळ या जिल्ह्यात शेती/फळपिकांचे नुकसान झाल्याचे आढळून आले नाही.

(२) खरीप-२०१४ मधील बाधित शेतकऱ्यांना अर्थसहाय्य करण्यासाठी शासनाने रुपये ४०००.०० कोटी इतका निधी वाटपासाठी उपलब्ध करुन दिलेला आहे.

(३) व (४) सदर नुकसानीची पाहणी करण्यात आली असून, एकूण ४२७०३.४५ हेक्टर क्षेत्रात शेती/फळपिकांचे नुकसान झाल्याचे आढळून आले. शासनाने दिनांक ४ फेब्रुवारी, २०१५ अन्वये घेतलेल्या निर्णयानुसार माहे नोव्हेंबर व डिसेंबर, २०१४ मध्ये अवेळी पाऊस व गारपीट यामुळे पिकांच्या झालेल्या नुकसानीसाठी मदत व सवलती देण्यात आल्या आहेत.

तसेच विदर्भ व मराठवाडयातील परवानाधारक सावकारांकडून कर्ज घेतलेल्या सुमारे २,२३,१५७ शेतकऱ्यांचे कर्ज व त्यावरील व्याजापोटी रुपये १७१.३० कोटी शासनामार्फत संबंधित सावकारास अदा करुन शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### सौर उर्जेवर आधारीत सयंत्रास शासकीय अनुदान देण्याबाबत

**(३५) * ५९६३ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्युत पुरवठयाच्या कमतरतेमुळे सौर ऊर्जा हा अत्यंत महत्वाचा व उपयुक्त पर्याय ठरत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सौर उर्जेवर चालणा-या सौर दिवे/घरगुती दिवे/कंदील/पॉवरपॅक/व्हील सोलर व सोलर ट्रॅफिक सिग्नल इ.सयंत्रास शासनाकडून अनुदान देण्यात येत नसल्यामुळे सौर उर्जोचा वापर कमी प्रमाणात करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सौर उर्जेवर चालणा-या संयत्रास शासनाने अनुदान द्यावे, अशी मागणी ठाणे जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी दिनांक १० जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास मा.उर्जा मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे पत्र निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निवेदन पत्राचे अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे अथवा येत आहे तसेच याप्रकरणी धोरणात्मक निर्णय घेण्याचे दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय.

(२) हे खरे नाही. केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु नॅशनल सोलर मिशन (जेएनएनएसएम) कार्यक्रमांतर्गत सौर उर्जेच्या विविध साधनांसाठी काही प्रमाणात अनुदान उपलब्ध आहे.

(३) होय, खरे आहे. विभागास हे पत्र मार्च महिन्यात प्राप्त झाले आहे.

(४) सदर पत्रास कार्यवाही सुरु असून, राज्य शासनामार्फत सौर उर्जा वापरासाठी एकत्रित धोरण तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### जायकवाडी (औरंगाबाद) प्रकल्पग्रस्तांना जमिनी देण्याबाबत

**(३६) * ३९४२ श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.संदिप बाजोरिया, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जायकवाडी (औरंगाबाद) प्रकल्पामुळे प्रकल्पग्रस्त झालेल्या बहुतांशीना अद्याप जमिनी दिल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धरणग्रस्तांना जमिनी न मिळाल्याने त्यांना हलाखीचे जीवन जगावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी त्वरित निर्णय घेऊन धरणग्रस्तांना जमिनी देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे आहे.

(२) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) जायकवाडी प्रकल्पामुळे अहमदनगर जिल्ह्यातील ६२९२ व औरंगाबाद जिल्ह्यातील ११,२०३ खातेदार बाधित झाले होते. त्यापैकी अहमदनगर जिल्ह्यातील ५०५६ व औरंगाबाद जिल्ह्यातील ७२८ पात्र प्रकल्पाग्रस्तांना पर्यायी जमिनिचे वाटप करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**आदिवासींच्या खरेदी खताच्या नावावर जमिनीची बेकायदा विक्री होत असल्याबाबत**

**(३७) * ६०२६ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील डहाणू, तलासरी, विक्रमगड, पालघर तालुक्यातील सफाळे, बोईसर, कासा, मनोर या गावांमध्ये आदिवासींच्या खरेदी खताच्या नावावर जमिनीची बेकायदा विक्री होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याची शासनाने चौकशी वा पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर तालुक्यातील व गावातील आदिवासींची जमीन हस्तांतरित करणा-या किती व्यक्तींना आतापर्यंत अटक करून शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, होत असलेल्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात अवकाळी पावसामुळे शेतीचे व फळांचे मोठ्या प्रमाणात झालेले नुकसान**

**(३८) * ५२६२ डॉ.अपूर्व हिरे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : तारांकित प्रश्न क्रमांक ८५३ ला दिनांक ८ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१४ या कालावधीत झालेल्या अवकाळी पावसामुळे ५० टक्के च्या वरील सुमारे ३२०७९.२५ हेक्टर क्षेत्रात शेती/फळपिकांचे नुकसान झाले असुन नुकसानग्रस्त शेतक-यांना मदत देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक, मालेगांव, निफाड, कळवण, चांदवड, दिंडोरी व सटाणा येथे झालेल्या गारपीट व अवकाळी पावसामुळे हजारो हेक्टर जमिनीवर पिकांचे व फळबागांचे झालेल्या नुकसानीचा मा.राज्यमंत्री यांनी माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान पाहणी करण्यात येवूनही अद्यापही शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तुत विचाराधीन बाबीवर शासनाचा विचार पुर्ण झाला आहे काय व त्यानुषंगाने किती नुकसानग्रस्त शेतक-यांना मदतीचे वाटप करण्यात आले आहे,
(४) असल्यास, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्वरीत नुकसान भरपाई मिळण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१४ या कालावधीत अवकाळी पाऊस, वादळी वारा व गारपीट यामुळे शेतीपिके व फळपिकांचे ५० टक्केपेक्षा जास्त नुकसान झालेले १३ जिल्ह्यातील एकूण क्षेत्र १६५९९ हेक्टर इतके आहे.
(२) शेतक-यांना मदत देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) व (४) माहे ऑक्टोबर-२०१४ या कालावधीत अवकाळी पाऊस, वादळी वारा या नैसर्गिक आपत्तीमुळे १२३२ हेक्टर क्षेत्रावरील शेतीपिके व फळपिकांचे ५० टक्केपेक्षा जास्त नुकसान झालेले आहे. सदर नुकसानीच्या क्षेत्रास मदत देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

माहे नोव्हेंबर-२०१४ या कालावधीत अवकाळी पाऊस व गारपीट यामुळे १५३६७ हेक्टर क्षेत्रावरील शेतीपिके व फळपिकांचे ५० टक्केपेक्षा जास्त नुकसान झालेले आहे. सदर नुकसानीच्या क्षेत्रास विशेष दराने मदत देण्यासंदर्भात महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.सीएलएस-२०१५/प्र.क्र.२/म-३, दि.४ फेब्रुवारी, २०१५ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मोटार वाहन परवाना ऑन लाईन पध्दतीने सुरू करण्याच्या प्रक्रीयेबाबत**

**(३९) * २७१५ श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य परीवहन विभागाने परीवहन विभागांतर्गत मोटर वाहन परवाना ऑन लाईन प्रक्रीया दिनांक १ डिसेंबर, २०१४ पासुन सुरवात केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या ऑनलाईन प्रक्रियेमुळे ग्रामीण भागात विद्युत पूर्ण वेळ उपलब्ध नसल्यामुळे तसेच संगणकीय अज्ञान असलेल्यांचे प्रचंड हाल होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ग्रामीण भागातील नागरीकांकरीता तसेच संगणकीय परीपूर्ण ज्ञान नसलेल्यांकरीता राज्य शासन जुनीच पध्दत अवलंबिणार आहे काय,
(४) नसल्यास, पर्यायी कोणती उपाययोजना अवलंबविण्यात येणार आहे ?
**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) ग्रामीण भागातील व निरक्षर अर्जदारांकरिता सेतु/संग्राम केंद्रातून अपॉईंटमेंटसाठी अर्ज दाखल करण्याची बाब कार्यवाहीखाली आहे. याशिवाय मोबाईल फोनवरुन अपॉईंटमेंट घेण्यासाठी सुविधा विकसित करण्यात येत आहे.

-----------------

### अवैध वाहतुकीकडे आरटीओचे होत असलेले दुर्लक्ष

**(४०) * ५४०७ श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यात स्कुल बसेसची तपासणी करुन आरटीओ मार्फत कारवाई करण्यात येत आहे मात्र अवैध वाहतुकीकडे आरटीओचे दुर्लक्ष होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबई-पुणे येथे शहरातील मुदत संपलेल्या अनेक स्क्रॅप रिक्षा चालविल्या जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. दिवाकर रावते :** (१) अवैध प्रवासी वाहतुक करणा-या वाहनांवर माहे जानेवारी, २०१५ मध्ये १९८ वाहने तपासणी करुन दोषी आढळलेल्या १३२ वाहनांवर कारवाई करुन कर रुपाने रु.१,४८,०००/- व तडजोड शुल्क रु.१,६५,०००/- असे एकूण रु.३,१३,०००/- इतका महसूल वसूल करण्यात आला आहे.

(२) मुंबई-पुणे शहरातील ज्या रिक्षा स्क्रॅप करण्यात आलेल्या आहेत त्या ऑटो-रिक्षा सोलापूरमध्ये चालताना आढळल्यास त्यांच्याविरुद्ध जप्तीची कारवाई होते. माहे जुलै, २०१३ पासून आजपर्यंत ५१७ रिक्षा जप्त केल्या आहेत व १७२ रिक्षा लिलावाद्वारे रिक्षांचे तुकडे करुन विक्री केल्या आहेत.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### राज्यात एस.टी.प्रवाशी भाडेवाढ केल्याबाबत

**(४१) * ४२७७ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.माणिकराव ठाकरे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एस.टी.प्रशासन शासनाने मंजूर केलेल्या भाडेवाढ सूत्राअंतर्गत डिझेल आणि कर्मचारी महागाई भत्ता वाढीचे कारण पुढे करीत गेल्या वर्षभरात ५ वेळा प्रवासी भाडेवाढ करुन सर्व सामान्यांवर आर्थिक भार टाकला तरीही एस.टी.च्या तोटयाचा आलेख वाढतच असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डिझेल दर कमी झाल्याने एस.टी.प्रवाशी भाडयात शासन कपात करणार काय अशी जनमानसात चर्चा आहे, हे ही खरे आहे काय,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) हे खरे आहे.

लोकप्रतिनिधींकडून प्रवासभाडे कमी करण्याबाबत मागणी होत आहे. डिझेल दरात जरी कपात झालेली असली तरी रा.प.महामंडळाने सन २०१२-२०१६ च्या कामगार करारापोटी कर्मचारी वेतनवाढीचा प्रतिवर्ष रु. ५१४ कोटी याप्रमाणे चार वर्षाचा एकूण रु.२०५६ कोटी आर्थिक भार रा.प.महामंडळावर आहे. डिझेल दर कमी झाल्याची बचत रु. १९१ कोटी इतकी आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला सन २०१३-१४ मध्ये रु. ५७२.६२ कोटी इतका तोटा झाला आहे.

दि.१६.०२.२०१५ व ०१.०३.२०१५ रोजी केंद्र शासनाने डिझेलच्या दरात वाढ केली आहे. सद्यस्थितीत झालेल्या डिझेल दर कपातीपेक्षा कर्मचारी / अधिकारी वेतनवाढ व पथकराची रक्कम याचा आर्थिक भार अधिक आहे. या सर्व कारणांमुळे रा.प.महामंडळास एस.टी.प्रवास भाडयात कपात करणे शक्य नाही. अशीच परिस्थिती राहिल्यास भविष्यात भाडेवाढ करणे अपरिहार्य होईल. तसेच रा.प.महामंडळाने विविध सवलती व योजनांव्दारे तसेच सामाजिक बांधिलकीचे भान ठेऊन राज्यातील अतिदुर्गम ते शहरापर्यंत प्रवासी जनतेस किफायतशीर सेवा दिलेली आहे.

-----------------

### अमरावती जिल्ह्यतील भातकुली तालुक्यात रेतीची अवैधरित्या होत असलेली वाहतुक

**(४२) * ५७०२ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भातकुली तालुक्यात (जि.अमरावती) रेतीची अवैधरित्या वाहतूक करणारी गाडी पकडली असता रेतीमाफीयांनी तलाठ्याला मारहाण करुन पेट्रोल टाकून जाळून टाकण्याची धमकी दिल्याचा खळबळजनक प्रकार माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अमरावती जिल्ह्यात रेतीमाफीयाकडून महसूल विभागातील कर्मचा-यांवरील हल्ल्याच्या प्रकारात वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर प्रकरणातील आरोपींवर कोणती कारवाई केली तसेच रेतीमाफीयावर रोख लावण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) अमरावती जिल्ह्यातील मौजा भातकुली येथे दिनांक २९/१२/२०१४ रोजी अवैध रेती वाहतूक करीत असलेल्या ट्रॅक्टरवर कारवाई करतांना संबंधित वाहन मालक यांनी नायब तहसिलदार भातकुली व तलाठी अंतापूर यांना मारहाण केली व जिवे मारण्याचा प्रयत्न केला. सदर प्रकरणी संबंधितांविरुध्द भातकुली पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने ३ व्यक्तींना अटक करण्यात आलेली असून, आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीमध्ये आहेत. प्रकरणी पोलीस तपास सुरु आहे.

अमरावती जिल्ह्यात अवैध रेती उत्खनन/वाहतूक करणा-यांकडून महसूल विभागातील कर्मचा-यांना शिवीगाळ व मारहाण केल्याच्या वर्ष २०१३, २०१४ व २०१५ मध्ये अनुक्रमे ५, १ व १ घटना घडलेल्या असून सदर प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई उपनगरात धावणा-या ३५ हजार अनधिकृत रिक्षांवर तात्काळ कारवाई करणेबाबत**

**(४३) * ४६०१ श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजधानी दिल्लीत घडलेल्या 'उंबर' प्रकरणानंतर मुंबई महानगरातील रिक्षा टॅक्सी प्रवास करणा-या महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून या पार्श्वभूमीवर मुंबई उपनगरात धावणा-या तब्बल ३५ हजार रिक्षा अनधिकृत असल्याचा दावा मुंबई ऑटोरिक्षामेन्स युनियनेच केला आहे, हे खरे आहे काय,
(२) परिवहन प्रशासनासोबत असलेल्या हितसंबंधामुळेच एवढया मोठया प्रमाणात अवैध वाहतूक सुरु असल्याचा आरोप माहे डिसेंबर २०१४ मधील पहिल्या पंधरवाडयात घेतलेल्या पत्रकार परिषदेत जाहिररित्या केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) मुंबई ऑटोरिक्षामेन्स युनियनने वारंवार संघटनेमार्फत परिवहन प्रशासनास अवैध वाहतुकीच्या तक्रारी करण्यात आल्या असतानाही केवळ तात्पुरती कारवाई करणारे प्रशासन केवळ दंडात्मक कारवाई करून शांत बसत आहे, परिणामत: ५ वर्षापूर्वी १० हजारांचा आकडा असलेल्या अवैध वाहतूकीने आज ४० हजारांपर्यंत मजल मारली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अवैध वाहतूकीवर कायमस्वरुपी तोडगा काढण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती ठोस कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) अशा स्वरुपाचे कोणतेही निवेदन शासनास प्राप्त झालेले नाही. तसेच, ही बाब वस्तुस्थितीला धरुन नाही.
(३) हे खरे नाही.
(४) मुंबई उपनगरातील परिवहन कार्यालयांच्या भरारी पथकामार्फत ऑटोरिक्षामधुन होणा-या अवैध प्रवासी वाहतूकी विरुद्ध नियमित तपासणी करुन कारवाई करण्यात येते. मुंबईतील परिवहन कार्यालयांच्या भरारी पथकांनी माहे एप्रिल, २०१४ ते माहे जानेवारी, २०१५ या कालावधीत एकूण २,८३६ ऑटो-रिक्षांना विविध गुन्ह्यांखाली प्रतिवेदित केले आहे.

मुंबई शहरातील अवैध वाहतूकीविरुद्ध पोलीस (वाहतूक) विभागामार्फत सन २०१४ मध्ये १३०२ मोटार वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली आहे.

-----------------

**कोकणात कडाक्याच्या थंडीने मोहराला धरु लागलेल्या कैऱ्या गळून पडत असल्यामुळे हापूस आंब्याचे पीक धोक्यात आल्याबाबत**

**(४४) * ४६६७ श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हापूस आंब्यासाठी युरोपिय समुदायाने आयात बंदी उठविण्याचा निर्णय घेतला असतानाच कोकणात पडत असलेल्या कडाक्याच्या थंडीने मोहराला धरु लागलेल्या कैऱ्या गळून पडत असल्यामुळे हापूस आंब्याचे पीक धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, कैऱ्यांची गळती रोखण्यासाठी शासनाने शेतकऱ्यांना कोणती मदत केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप शेतकऱ्यांना मदत करण्याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) व (४) आंबा कैऱ्यांची फळगळ होऊ नये, यासाठी कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांना आंबा झाडांवर औषधी फवारणी करण्याचा सल्ला एसएमएस द्वारे तसेच स्थानिक वृत्तपत्रांच्या माध्यमातून देण्यात आला असून त्यानुसार शेतकरी औषधी फवारणीद्वारे फळगळतीवर उपाययोजना करीत आहेत.

-----------------

**कोकणातील भातशेतीसह आंबा, काजू बागांच्या नुकसानीचे पंचनामे करुन नुकसान भरपाई देणेबाबत**

**(४५) * ४७७६ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणात माहे ऑक्टोबर-डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान अवकाळी पाऊस पडून भातशेतीसह आंबा, काजू पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान होऊनही रत्नागिरी कृषि विभागाने नुकसान अहवाल निरंक दाखविल्याचे माहे जानेवारी, २०१४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोकणातील भातशेतीसह आंबा, काजू बागांचे नुकसानीचे पंचनामे करुन नुकसान भरपाई देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय. माहे ऑक्टोबर-डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान आंबा, काजू पिकास तसेच भात पिकाचे नुकसान झालेले नव्हते. त्यामुळे नुकसान अहवाल निरंक दाखविण्यात आलेला होता.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक जिल्हयातील पाटोदा येथील वीज उपकेंद्रात युवकाला वीज वितरण कंपनीच्या निष्काळजीपणामुळे झालेला अपघात**

**(४६) * ४८१९ श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाटोदा (जि.नाशिक) येथील वीज उपकेंद्रात कोब्रा कंपनीच्या ठेकेदारी गटात लाईनवर नवीन वायर टाकण्याचे काम करणाऱ्या एका युवकाला वीज वितरण कंपनीच्या निष्काळजीपणामुळे अपघात होवून दोन्ही हात गमवावे लागल्याची गंभीर घटना दिनांक १२ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यादरम्यान उघडकीस आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोन्ही हात गमवावे लागलेल्या या तरुणास ठेकेदार वा शासनाने जास्तीत जास्त आर्थिक व वैद्यकीय मदत देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले,
(५) याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशतः खरे आहे.
सदर घटना दिनांक २३ नोव्हेंबर २०१२ रोजी घडली आहे.
(२) महावितरण कंपनीकडून दिनांक २९.११.२०१२ रोजी तात्काळ आर्थिक मदत रु. ५०००/- देण्यात आली असून सदर युवकाने नुकसान भरपाई मिळण्यासाठी प्रथम वर्ग कामगार न्यायालय, नाशिक यांचेकडे दावा दाखल केला आहे.
(३) होय.
(४) शासकीय विद्युत निरीक्षक नाशिक यांच्या अहवालानुसार सदर अपघातास कनिष्ठ अभियंता व उपयंत्रचालक हे जबाबदार असल्याचे चौकशी अंती निष्पन्न झाले. पाटोदा उपकेंद्राचे उपयंत्रचालक यांना कार्यकारी अभियंता मनमाड यांनी निलंबीत केले असून त्यांची खातेअंतर्गत चौकशी करुन त्यांचा निलंबन कालावधी शिक्षा म्हणून ग्राह्य धरण्यात आला असून त्याची वार्षिक वेतन वाढ एक वर्षाकरीता संचयी परिणामाने रोखण्याची शिक्षा केली आहे. कनिष्ठ अभियंता यांच्यावर आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रेती घाटाचे लिलाव न झाल्याने चंद्रपूर जिल्ह्यातील विकासकामे बंद होत असल्याबाबत**

**(४७) * ५१५४ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यात १७३ रेती घाट असून त्यापैकी केवळ ५९ रेती घाटाचे लिलाव होवून अद्यापही फेब्रुवारी महिना येवूनही १४४ रेती घाटाचे लिलाव न झाल्याने शासनाच्या महसूलाचे मोठया प्रमाणात नुकसान होत असल्याचे दिनांक २२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रेती घाटाचे लिलाव न झाल्याने जिल्ह्यातील विकास कामे बंद होऊन गरीब व सामान्यांना त्याचा फटका बसत असल्याचे दिसून येत असल्याने त्याबाबत लोकप्रतिनिधी या नात्याने मा.महसूल मंत्री यांना दिनांक २ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्र दिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रेतीघाटाचे लिलाव शासन त्वरीत करणार आहे काय व केव्हा,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) दिनांक ०२/०२/२०१५ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे.

चंद्रपूर जिल्ह्यात सन २०१४-२०१५ या वर्षाकरिता १७३ वाळूगट लिलावासाठी सर्वेक्षण करण्यात आले होते. सदर १७३ वाळूगटांपैकी ११५ वाळूगट हे भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने अयोग्य ठरविले होते. तसेच उर्वरित ५८ वाळूगटांपैकी १ वाळूगट ग्रामसभेने विरोध दर्शविला होता. त्यामुळे पर्यावरण विभागाने ५७ वाळूगटांना पर्यावरण अनुमती दिली होती. दिनांक १३/०१/२०१५ पासून चंद्रपूर जिल्ह्यात घेण्यात आलेल्या वाळू /रेती लिलावात ५७ पैकी ३८ वाळू / रेती गटांचा लिलाव झाला असुन, त्यातुन शासनास रुपये ७, ०१, २७, ५५६ /- इतका महसूल प्राप्त झाला आहे. वाळू / रेती लिलावाची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्रासह कोकणच्या किनारपट्टी भागात बाहेरच्या राज्यातील अत्याधुनिक ट्रॉलर्स पर्ससीन जाळयांद्वारे होत असलेली बेसुमार मासेमारी रोखण्याबाबत**

**(४८) * ५४३६ श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्रासह कोकणच्या किनारपट्टीत भरडखोल, बोर्ली, नांदगाव, राजपूरी या मुरुड तालुक्यातील भागात बाहेरच्या राज्यातील अत्याधुनिक ट्रॉलर्स पर्ससीन जाळयांद्वारे बेसुमार मासेमारी करीत असल्याचे दिनांक २६ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पर्ससीन जाळयांमध्ये छोटयात छोटे मासेही अडकले जात असल्याने या भागात मासळीचा तुटवडा होवून स्थानिक मच्छिमारांना मासळीच्या दुष्काळाला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या पर्ससीन जाळयांवर परदेशात काही प्रमाणात बंधने आहेत, अशाच प्रकारे राज्यातही शासनाने यावर बंधने ठेवण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही.
(२) नाही.
(३) पर्ससीन नेट पध्दतीने होणा-या मासेमारीचा पारंपारीक मासेमारीवर होणारा परिणाम तसेच पर्यावरणावर होणारा परिणाम याबाबत अभ्यास करण्यासाठी तज्ञ समिती गठीत करण्यात आली असून समितीने शासनास अहवाल सादर केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**इगतपुरी तालुक्यातील (जि.नाशिक) मानस रिसॉर्टद्वारे आदिवासींची काही जमिन विना परवानगी वापल्याबाबत**

**(४९) * ६०४५ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इगतपुरी तालुक्यातील (जि.नाशिक) मानस रिसॉर्टव्दारे आदिवासींची काही जमीन विना परवानगी वापरण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी संबंधित कायद्यानुसार आदिवासींची जमीन त्यांना परत करण्यासाठी काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) असे निदर्शनास आले नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे फकीर जवळा (ता.धारूर, जि.बीड) याठिकाणी नांदेड, कंधार, पाथरी, पैठण, नेवासा, नांदगांव, आबंड आदि आगाराच्या एस.टी.बसेसना थांबा देण्याबाबत**

**(५०) * ६१४८ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे फकीर जवळा (ता.धारुर, जि.बीड) या ठिकाणी नांदेड, कंधार, पाथरी, पैठण, नेवासा, नांदगांव, आबंड आदि आगाराच्या एस.टी.बसेसना थांबा देण्याची मागणी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक २२ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) होय.
बीड जिल्हयातील परळी-बीड रस्त्यावरील फकीर जवळा येथे सर्व जलद व अतिजलद बसलेला थांबा देण्यात आलेला असून या सर्व ठिकाणी विनंती थांब्याचा बोर्ड लावलेला आहे. बीड विभागातील आगार प्रमुखांमार्फत सर्व चालक, वाहकांना सदर ठिकाणी बसेस थांबवून प्रवासी चढ-उतार करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्याप्रमाणे बीड विभागातील सर्व बसेस मौजे फकीर जवळा येथे थांबवून प्रवासी चढ-उतार केली जाते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाहूर (मुंबई) उपनगरे येथील शासनाची सुमारे ३० एकर जमिनीचा पायोनिअर बिल्डर्स व डेव्हलपर्सने बेकायदेशीर कब्जा करण्याबाबत**

**(५१) * ५८८३ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाहूर (मुंबई/ उपनगरे) येथील सर्व्हे नं. १६, १७, २१ ते २५ मधील शासनाची सुमारे ३० एकर जमिनीचा पायोनिअर बिल्डर्स व डेव्हलपर्सने बेकायदेशीर कब्जा करुन त्यावरील काही जागेत बेकायदेशीरपणे १८ मजल्याच्या दोन इमारतीचे बांधकाम केले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बिल्डर्सने नाहूर येथील सर्व्हे नं. ९५ /२ , ७९५/३A -४ ५A-५C, ७९५ /११ ते १४, ७९५/१६ मधील जमीन समाज कल्याण केंद्र, माध्यमिक शाळा, महानगरपालिका मार्केट, फेरीवाला मार्केटसाठी राखीव असून त्यावर त्याने कब्जा करुन त्याचा बेकायदेशीर वापर केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी श्री. कुंदन पाटील राहणार भांडुप यांनी जिल्हाधिकारी, महसूलमंत्री आणि मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक १८ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास तक्रार केली आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास, चौकशीत काय निदर्शनास आले व तदनुसार दोषींविरुध्द तसेच उक्त ३० एकर जमीन ताब्यात घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (४) प्रश्नांकीत जमिनीवर बृहन्मुंबई महापालिकेच्या आय ओडी दिनांक २२.१०.१९९६ व अमेंडेड प्लॅन दिनांक २५.३.२०१० नुसार तीन रहिवाशी इमारतीसाठी श्री. जनार्दन आत्मारात पाटील व श्री. वसंत आत्माराम पाटील यांचे कुलमुखमत्यार श्री. पालाल वर्धन, भागीदार पायांनियर हाऊसिंग यांना मंजुरी देण्यात आलेली आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने फेरफार क्र. १००७, दिनांक १२.३.२०१० अन्वये सदर मिळकतीस श्री. जनार्दन आत्माराम पाटील व इतर यांची नावे दखल झाली होती.

तथापि, सदर व काही इतर मिळकतीबाबत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम २०(२) अंतर्गतच्या चौकशीत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक ४.१.२०१४ रोजी आदेश पारीत करुन सदर जमीन महाराष्ट्र शासनाची असल्याचा निष्कर्ष काढला होता.

जिल्हाधिकारी, यांच्या या आदेशाविरुध्द मिठागर उप आयुक्त यांनी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडे अपिल दाखल केले असून जिल्हाधिकारी यांच्या आदेशास विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी स्थगिती दिली आहे.

तसेच जिल्हाधिकारी यांच्या उपरोक्त आदेशाविरुध्द श्री. वसंत आत्माराम पाटील व इतर यांनी मा. मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका क्र. ४४०७/२०१४ दाखल केली असता, मा. मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक ६.५.२०१४ रोजीच्या आदेशान्वये प्रश्नांकित जमिनी सरकार जमा करण्याबाबत जिल्हाधिका-यांचे वर नमूद दिनांक ४.१.२०१४ चे आदेश रद्द केले असून प्रकरण फेर विचार व निर्णयासाठी जिल्हाधिकारी यांचेकडे परत पाठविले आहे.

मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या वरील आदेशाच्या अनुषंगाने या प्रकरणाची फेरसुनावणी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचेकडे चालू आहे.

श्री. कुंदन पाटील यांनी याच मुद्यांबाबत तक्रार केली आहे. यानुषंगाने वर नमूद केल्यानुसार जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचेकडे फेरसुनावणी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुसद तालुक्यात (जि.यवतमाळ) नियमांचे उल्लंघन करून भूखंडाचे खरेदी विक्री व्यवहार सुरु असल्याबाबत**

**(५२) * ३४२९ श्री.संदिप बाजोरिया, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुसद तालुक्यात (जि.यवतमाळ) दुय्यम निबंधक नोंदणी कार्यालय नगररचना, कायदा आणि बांधकाम नियंत्रण नियमावलीचे उल्लंघन करुन भूखंडाचे खरेदी विक्री व्यवहार सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात उघडकीस आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर बेकायदा सुरु असलेले व्यवहार बंद करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

तथापि, सदर मुदयाबाबत दैनिक लोकमत हॅलो यवतमाळ मध्ये दि. ०४/०१/२०१५ रोजी बातमी प्रकाशिस झाली होती.

(२) व (३) प्राप्त अहवालानुसार वर्तमान पत्रातील बातमीच्या अनुषंगाने दुय्यम निबंधक, पुसद, जि.यवतमाळ या कार्यालयातील दस्तांची चाचणी पध्दतीने केलेल्या तपासणीत नगररचना कायदा आणि बांधकाम नियंत्रक नियमावलीचे उल्लघन करुन भूखंडाचे बेकायदेशीर खरेदी-विक्री व्यवहार नोंदणी झाल्याचे आढळून आले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील आदिवासी भागात एस.टी.बसेस वाढविण्याबाबत**

**(५३) * ६०२७ श्री.आनंद ठाकूर, श्री.संजय दत्त, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील आदिवासी भागात मर्यादीत एस.टी.च्या फे-या असल्यामुळे विद्यार्थ्यांपासून नोकरी करणा-या कर्मचा-याची फार मोठी गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न क्र.१ व २ नूसार तालुक्यातील आदिवासी भागात नागरिकांची होणारी गैरसोय पाहता एस.टी.बसेस वाढविण्याबाबत शासन कोणती उपाययोजना करणार आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) राज्य परिवहन महामंडळाच्या डहाणु आगारकडुन एकूण ४७ नियते, ३९१ फे-या व १४४३६.१ कि.मी. दैनंदिन चालनात आहेत. त्यापैकी २६ नियते, ३४७ फे-या व ७४९० कि.मी. डहाणू तालुक्यातील आदिवासी भागातील वाहतुकीकरीता चालविले जातात. उर्वरित नियते, कि.मी व फे-या या लांब पल्ल, मध्यम लांब पलला मार्गावर चालविल्या जातात. राज्य परिवहन महामंडळाने सदर फे-याद्वारे डहाणू तालुक्यातील विद्यार्थी व नोकरवर्ग यांना सोय उपलब करुन दिलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक जिल्ह्यात डाळींब, कांदा व अन्य पिकांवर बदललेल्या वातावरणामुळे रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने पिके धोक्यात आल्याबाबत**

**(५४) * ५२६६ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात सटाणा व अन्य तालुक्यात प्रत्येक वर्षी डाळींब व कांदा पिकांवर बदललेल्या ढगाळ व आर्द्रतायुक्त वातावरणाचा विपरीत परिणाम होऊन करपा, मावा, डावणी सारख्या बुरशीजन्य व डाळींब बागात तेल्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने शेतक-यांचे प्रचंड नुकसान होत असल्याची बाब शासनाचे निदर्शनास आली आहे काय,

(२) असल्यास, कृषी विभागाकडून मर किंवा तेल्या रोगासंदर्भात मागील ५-६ वर्षात कोणतेही संशोधन नाही वा त्यासंदर्भात डाळींब उत्पादकांना उचित मार्गदर्शन नाही व जैव तंत्रज्ञान व संशोधन प्रयोगशाळा कार्यान्वीत झालेली नाही, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रत्येक हंगामात पिकांवर रोग पडून शेतक-यांचे प्रचंड नुकसान होत असल्याच्या पार्श्वभूमीवर शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात येत आहे वा येणार आहे,

(४) तसेच लखमापुर (ता.बागलाण) येथील डाळींब संशोधन केंद्राचे काम कधी चालू होणार आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

(२) यासंदर्भात कृषी विभाग व राहूरी कृषी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने डाळींबावरील तेल्या व मर रोगाबाबत वेळोवेळी मेळावे, चर्चासत्रे आयोजीत करण्यात येतात. तसेच डाळींब पिकावरील किड व रोगाचे नियंत्रणाकरीता एसएमएस द्वारे शेतकऱ्यांना कृषी विभागाकडून वेळोवेळी मार्गदर्शन केले जाते.

(३) डाळींबावरील तेल्या रोगाच्या नियंत्रणासाठी डाळींब संशोधन व तंत्रज्ञान प्रसारण केंद्र लखमापूर, ता.बागलाण येथील शास्त्रज्ञांकडून सटाणा व अन्य तालुक्यात वेळोवेळी कृषी मेळावे आयोजीत करुन प्रसिध्दी व प्रचाराचे काम करण्यात येते. तसेच ज्या ठिकाणी ५० टक्क्यांच्यावर नुकसान झालेले आहे, त्या ठिकाणी ५० टक्के अनुदानावर औषधांचा पुरवठा करण्यात येतो. सटाणा तालुक्यात डाळींब पिकावरील तेल्या रोगाच्या नियंत्रणासाठी सन २००८-०९ पासून आदर्श व्यवस्थापन पध्दती राबविण्यात येत आहे. त्यासाठी शासनाने आजपावेतो सुमारे रु. ८०.०० कोटी इतका निधी खर्च केलेला आहे.

(४) लखमापूर (ता.बागलाण) येथील डाळींब संशोधन केंद्र जून, २०१२ पासून कार्यान्वित झालेले असून सदर संशोधन केंद्रावरुन डाळींब लागवड तसेच तेल्या /मर रोगाबाबत चर्चासत्र, मेळावे घेऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येते.

-----------------

**सोलापूर जिल्ह्यातील क्षमतेपेक्षा जास्त ऊस वाहतूक करणा-यांवर कारवाई करण्याबाबत**

**(५५) * ४२९७ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील बहुतांश साखर कारखान्यांचा गाळप हंगाम असून ऊस वाहतूक करणारे ट्रेलर क्षमतेपेक्षा जास्त ऊस वाहतुक करीत असून या वाहनांना परावर्तक (रिप्लेक्टर) नसल्यामुळे इतर वाहनानांही वाहतूक धोकादायक ठरून अनेकदा अपघात होत असूनही ऊस कारखाने व आरटीओ यांचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, क्षमतेपेक्षा जास्त ऊस वाहतुक करणा-यांवर दुर्लक्ष व टाळाटाळ करणारे आरटीओ कार्यालय आणि ऊस कारखाने यांचेवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे नाही.

(२) सोलापूर जिल्ह्यातील साखर कारखान्यांना दिनांक १३.१.२०१५ च्या पत्रान्वये ऊसाची भार क्षमतेपेक्षा अधिक वाहतूक करणा-या वाहनांना प्रतिबंध करण्याबाबत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर यांनी सूचना दिलेल्या आहेत.

तसेच ऊस वाहतूक करणा-या वाहनांवर परावर्तक पट्टी (रिप्लेक्टीव्ह टेप) लावण्याबाबत दि.२९.११.२०१४ च्या पत्रान्वये साखर कारखान्यांना कळविण्यात आले आहे.

साखर कारखान्यांनी परावर्तक पट्टी (Reflectors) ची अंमलबजावणी केली नाही, तर होणारे अपघात रोखण्यासाठी रात्रीची ऊस वाहतूक बंद करण्याचे आदेश देण्यात येतील. आणि त्यानंतर वाहतूक आढळून आल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पशुसंवर्धन विभागातील पशूवैद्यकीय सेवेतील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(५६) * ५७०४ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे : तारांकित प्रश्न क्रमांक १८५२ ला दिनांक १५ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पशुसंवर्धन विभागातील पशूवैद्यकीय सेवेतील एकूण १०८४ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) गट-अ व गट-ब संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु असून गट-क व ड संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही आयुक्त पशुसंवर्धन यांचे स्तरावर सुरु आहे. पशुसंवर्धन विभागात रिक्त असलेली पशुधन विकास अधिकारी गट-अ संवर्गाची एकूण ३७२ पदे भरण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र सादर करण्यात आले असून त्यानुसार आयोगाव्दारे परिक्षा घेण्यात आली आहे. आयोगाकडून शिफारस पात्र उमेदवारांची यादी अद्यापि अप्राप्त आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रायगड जिल्ह्यातील नागाव येथील खाडीपात्रात 'डायनॉमिक्स व्हेकशन' या कंपनीने भराव टाकून खाडी बुजविण्यात आल्याबाबत**

**(५७) * ५५२१ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील नागाव येथील सुमारे ५० एकर खाडीपात्रात नियम धाब्यावर बसवून 'डायनॉमिक्स व्हेकशन' या कंपनीने दिनांक २२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यादरम्यान भराव टाकून खाडीपात्र बुजविण्याचा प्रकार उघडकीस आला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यांत आली आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय आढळून आले व तदनुसार संबंधितांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे कोणती?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) डायनामिक्स व्हेकेशन रिसोर्ट प्रा. लि. या कंपनीने त्यांच्या मालकीच्या मौजे नागांव येथील गट नंबर १२३७ मध्ये ओम साई ट्रेडर्स या कंपनीमार्फत १७, ००६ ब्रास मातीचा भराव केला आहे. त्यापैकी, १५,५०६ ब्रास मातीसाठी स्वामित्वधनाची रक्कम शासनजमा करुन, तहसिलदार अलिबाग यांच्याकडून दिनांक १४/०३/२०१४ ते दिनांक ०४/०३/२०१५ या कालावधीत रितसर परवानगी घेतली आहे. उर्वरित १५०० ब्रास मातीसाठी परवानगी घेतली नसल्याने, डायनामिक्स व्हेकेशन रिसोर्ट प्रा.लि. या कंपनीकडून रु. ७, ४५, ७२५/- इतकी दंडाची रक्कम वसूल करण्यात आली आहे.

-----------------

**केंद्रपुरस्कृत विविध योजनांसाठी केंद्र शासनाने दिलेला १४०० कोटी रूपयाचा निधी अखर्चित राहिल्याबाबत**

**(५८) * ४८२२ श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र पुरस्कृत विविध योजनांसाठी गेल्या १० वर्षापासून राज्याच्या कृषी विभागाला केंद्र शासनाने दिलेला १४०० कोटी रुपयांचा निधी अखर्चित राहिल्याची गंभीर बाब दिनांक ७ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निधी अखर्चित राहण्यामागील सर्वसाधारण कारणे काय,

(३) तसेच प्रश्न भाग (१) बाबत शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून कोणती कार्यवाही केली,

(५) तसेच सदर अखर्चित निधी पुनर्जिवित करुन केंद्र पुरस्कृत कृषी विकासाच्या योजनांचा राज्यातील शेतक-यांना लाभ देण्यासाठी शासनामार्फत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे.

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) केंद्र शासनाच्या अटीशर्तीच्या मर्यादेपेक्षा जास्त निधी कोणत्याही वर्षी अखंचित राहिला नाही. मर्यादित स्वरुपात राहिलेला निधी तदनंतर आर्थिक वर्षात पुनर्जिवीत करुन त्यासह उपलब्ध निधीद्‌वारे कृषि विकासाचे उपक्रम राबविण्यात आले आहेत.

-----------------

**परिवहन विभागाकडून वाहनधारकांना देण्यात येणारे नोंदणी प्रमाणपत्र (आरसी बुक) 'स्मार्ट कार्ड' साठी आकारण्यात येणारी फी जादा असल्याबाबत**

**(५९) * ५१५९ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वाहनाच्या खरेदीनंतर परिवहन विभागाकडून वाहनधारकांना देण्यात येणारे नोंदणी प्रमाणपत्र (आरसी बुक) ('स्मार्ट कार्ड) साठी आकारण्यात येणारी फी ३९४ रुपये घेण्यात येत असून वाहनधारकाची मोठया प्रमाणात लूट सुरु असल्याचे दिनांक ५ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर फी इतर राज्याच्या तुलनेत जादा असल्याचे उच्च न्यायालयात उघड झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली काय व त्यावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) होय.
(३) वाहनासाठीचे नोंदणी प्रमाणपत्र ऑप्टीकल स्मार्ट कार्ड देण्याची योजना सन २००२ पासून सुरु करण्यात आली होती. त्यासाठी निविदा मागवून सेवापुरवठादाराची निवड करण्यात आली होती. सदर ऑप्टीकल स्मार्ट कार्ड दि. २६/११/२०१४ पासून पुरविणे बंद करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**एस.टी.ची सेवा सुरळीत ठेवण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेणेबाबत**

**(६०) * ५८८९ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील एस.टी.महामंडळ हे सर्वसामान्य नागरिक आणि शेतकरी यांच्या घामाच्या पैशातून चालते त्यामुळे या घटकांसाठी एस.टी.ची सेवा सुरळीत ठेवण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेऊन एस.टी.च्या कारभारातून लवकरच आमुलाग्र बदल करण्यात येईल अशी माहिती राज्याचे परिवहन मंत्री यांनी दिनांक ८ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यादरम्यान दिलेली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली आहे काय,
(३)असल्यास,शासनाने आतापर्यंत कोणते धोरणात्मक निर्णय घेतले आहेत, त्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्याची अंमलबजावणी शासन केंव्हापासून करणार आहे,
(४) अद्याप शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिवाकर रावते :** (१) होय.
(२), (३) व (४) राज्य परिवहन महामंडळामध्ये चालकांच्या (कनिष्ठ) ७६३० पदांची भरती प्रक्रिया सुरु केली आहे. महामंडळातील ४० वर्षावरील सर्व चालकांची आरोग्य तपासणी नियमितपणे करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. तसेच सर्व चालकांसाठी मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था भोसरी, पुणे येथे उजळणी प्रशिक्षण कार्यक्रम सुरु करण्यात आला आहे.

अवैध प्रवासी वाहतूक व बसस्थानकांच्या लगतच्या २०० मीटर परिक्षेत्रातील अनारक्षित वाहनतळावर वाहने (नो पार्किंग झोन) उभी करणा-यांविरुध्द पोलिस आयुक्त (वाहतुक) यांना तसेच बसस्थानकांच्या परिक्षेत्रातील लगतच्या अतिक्रमीत अवैध दुकानांवर कडक कारवाई करण्याबाबत सचिव, नगरविकास विभाग यांना निर्देश देण्यात आलेले आहेत.

तसेच हिरकणी बसेसच्या सद्यस्थितीतील आसन व्यवस्थेत बदल करुन आसने पुढे-मागे सरकणारी आरामदायी आसन व्यवस्था करण्याचा निर्णय महामंडळाने घेतला आहे.

तसेच आगामी प्रवाशी गर्दीच्या हंगामामध्ये (एप्रिल, ते जून, २०१५) प्रवाशांच्या सेवेकरीता नियमित १५६०७ नियतांव्यतिरिक्त खास उन्हाळी गर्दीच्या हंगामासाठी ८९६ जादा नियते चालविण्याचा निर्णय घेतला आहे.

त्याचप्रमाणे दि. ०१.०१.२०१५ पासून मुंबई-पनवेल मार्गावर खारघर येथे नव्याने सुरु झालेल्या पथकर नाक्यावरुन रा.प. महामंडळाच्या बसेसना दि. ०३.०१.२०१५ रोजी प्रसिध्द झालेल्या अधिसूचनेद्वारे वगळण्यात आले आहे.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.